# जागृती

नासा येवतीकर

# जागृती

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जागृती

ना सा येवतीकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# जागृती

लेखक
नागोराव सा. येवतीकर

http://nasayeotikar.blogspot.com

फ़ोन – 9423625769

पत्ता : नागोराव सा. येवतीकर

मु. येवती पोस्ट येताळा
ता. धर्माबाद जि. नांदेड

ईमेल - nagorao26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841


App : https://play.google.com/store/apps/details? id=com.esahity.

प्रकाशन : २६ मार्च २०१८





©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .


नासा येवतीकर
मी...
एक शिक्षक




संवेदना


नासा येवतीकर
हरवलेले डोळे
कथासंग्रह

## ना सा येवतीकर

जागृती हे ना सा येवतीकरांचे ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े प्रकाशित होणारे तिसरे पुस्तक. शिक्षक, शाळा आणि एकूणच शिक्षण व्यवस्था यांचा नासा यांनी खोलात जाऊन अभ्यासही केला.

पण नासा त्यावर थांबले नाहीत. त्याहूनही खोलात जाऊन त्यांनी चिंतन, चर्चा आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्या आधारे प्रचंड लेखन केले. देशप्रेम म्हनजे देशाच्या भवितव्याचा विचार आणि देशाचे भवितव्य म्हणजे शिक्षण हा त्यांचा ठाम विचार आहे. आणि अत्यंत तळमळीने ते शिक्षण व्यवस्थेवरचे विचार लोकांपर्यंत जावे म्हणून स्वतःच्या खिशाला खार लावून आणि व्यक्तिगत खुशालीची पर्वा न करता जागृती करण्याचे कार्य ते करत असतात. व्यवसायाने ते प्राथमिक शिक्षक (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिरली, ता. बिलोली जि. नांदेड) आहेत.

शालेय जीवनापासुनच लिखाण करण्याची फारच आवड त्यामुळे विविध वर्तमानपत्र, दैनिक, साप्ताहिक, मासिकात वैचारिक लेख लिहिण्याचा त्यांना छंद आहे. जीवन-शिक्षण या शैक्षणिक मासिकातून सुध्दा यापूर्वी लेख प्रकाशित झाले आहेत. दैनिक लोकपत्रमध्ये दर सोमवारी ऑफ पिरियड सदराखाली एक वर्ष स्तंभलेखन केले आहेत, ज्यात शैक्षणिक विषयी विचार मांडले होते. ते लहान मुलांसाठी सुध्दा छोटेखानी लेख लिहितात तसेच त्याना मनोरंजनातून शब्दसंपत्ती वाढवी यांसाठी विविध मनोरंजक शब्दकोडे तयार करतात. जे की दैनिक देशोन्नतीच्या फनक्लब पेजवर प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी याच ई साहित्यच्या मदतीने संवेदना, मी एक शिक्षक हे वैचारिक लेख असलेले ई बुक आणि हरवलेले

डोळे हा ई कथासंग्रह प्रकाशित करण्यात आले आहे.विद्यार्थ्यांना सतत कामात व्यस्त ठेवण्यासाठी विविध उपक्रम तयार करतात आणि त्यां उपक्रमाच्या माध्यमातून शिकविण्याचा प्रयत्न असतो.

आता यावर्षी त्यांचे जागृती हे अंजन घालणारे चवथे पुस्तक सादर करीत आहोत. वाचकांना ते आवडेल याची खात्री आहे. वाचकांच्या प्रतिसादाची आम्ही वाट पाहू.

कृपया आपली मते नासा सरांना कळवा. त्यांचा संपर्क क्रमांक 9423625769 असून nagorao26@gmail.com हा त्यांचा मेल पत्ता आहे.

नासा हे सातत्यपूर्ण लेखक आहेत आणि आपले लेखन त नियमित रित्या ब्लॉगवर प्रसिद्ध करत असतात. त्यांचा http://nasayeotikar.blogspot.com हा ब्लॉग तुम्हाला नक्की आवडेल.

त्यांच्या संपर्कात रहा. तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवा. नासांच्या तळमळीने चाललेल्या नवभारतनिर्माणात आपण सामिल व्हा.

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

★★★★★★★★★★★★★★★★★★

## चवथ्या पुस्तकाच्या निमित्ताने

जागृती हे पुस्तक आपल्या हाती देताना मला मनस्वी विशेष आनंद होतो आहे. मुळात स्वतःला काही त्रास झाले की खूप दुःख होते आणि वेदना सुध्दा होतात. कारण त्यात स्वतःचे शरीर आणि मन गुंतलेले असते. कधी कधी असाच दुःखद प्रसंग इतरावर ओढावते, त्यात आपले शरीर आणि मन दोन्ही नसतात तरी आपण दुःखी होतो, कष्टी होतो. ती संवेदना मुळात प्रत्येकांच्या मनात जागी झाल्यास जागोजागी माणुसकी नक्कीच बघायला मिळाली असती. लोकांमध्ये जागृती निर्माण झाल्यास बरेच प्रश्न सुटू शकतात. याच विचारातून सध्या समाजातील लोकांना कोणत्या त्रासाला किंवा संकटाला तोंड द्यावे लागत आहे, याची जाणीव मला झाली आणि ते मी या ई पुस्तकाच्या माध्यमातून आपणासमोर मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे. तशीच जाणीव जागृती प्रत्येकांच्या मनात जागी झाल्यास एक नवा समाज बघायला मिळेल अशी आशा वाटते.

या पुस्तकात काही चूका किंवा त्रुटी आढळून आल्यास निःसंकोचपणे त्या चूका माझ्या निदर्शनास आणुन दिल्यास मी आपला अत्यंत आभारी राहीन. पुस्तकातील विचार किंवा ही जागृती पुस्तक आपणास आवडल्यास आपल्या मित्र परिवारात जरूर share कराल अशी अपेक्षा करतो. समीक्षक मित्रांनी या पुस्तकाचे समीक्षण करावे. धन्यवाद

- नागोराव सा. येवतीकर

फ़ोन – 9423625769

★★★★★★★★★★★★★★★★★★

अर्पण पत्रिका

जागृतीची ही जाणीव माझ्यात तयार होण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रोत्साहित करणारे माझ्या आई-वडीलासह सर्वांना अर्पण ...........

नागोराव सा. येवतीकर

★★★★★★★★★★★★★★★★★★

## ▪ अनुक्रम


- रंगात विखुरलेला माणूस
- जन्म मृत्यू विवाह नोंदणीचे महत्व
- मतदार जागृती आवश्यक
- जगाला प्रेम अर्पावे
- संपादकास पत्र
- स्मार्टफोनचा विळखा, वेळीच ओळखा
- साहित्यसेवा हेच खरे काम
- आई असावी जिजाऊसारखी
- हे विश्वची माझे घर
- मोबाईल महत्वाचे की शौचालय
- मरावे परी अवयवरुपी उरावे
- परावलंबी जीवन
- चला मित्र बनवूया
- पर्यटकांनी जबाबदारीने वागावे
- उद्याची सुंदर पहाट
- बुवाबाजीला वेळेवर ओळखा
- बायको
- मला माणूस व्हावेसे वाटते
- वळीव पाऊस आणि जीवन
- युवकांच्या हाती हुंड्याची दोरी
- बालविवाह कसे रोखता येतील ?

# रंगात विखुरलेला माणूस

भारतात विविध जातीचे आणि धर्माचे लोक राहतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या जात आणि धर्मानुसार वागतो, नव्हे त्याला वागावे लागते. अन्यथा अश्या लोकांना समाज समूहातून बाहेर करून वाळीत टाकते. म्हणून लोकांना जात आणि धर्माला चिकटून वागावे लागते यात त्याचाही नाईलाज असतो.

इंग्रजांच्या गुलामगिरीमध्ये असताना प्रत्येकाच्या डोळयासमोर उद्दिष्ट होते ते स्वातंत्र्याचे त्यामुळे कोणी जातीभेद किंवा धर्मभेद लक्षात न घेता एकाच तिरंगी झेंड्याखाली एकत्र आले म्हणून भारत देश इंग्रजी गुलामगिरीच्या जोखड्यातून स्वातंत्र्य झाले.

भारताला सहजासहजी स्वातंत्र्य मिळाले नसून त्यासाठी अनेक लोकांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली. देशासाठी प्रत्येकजण आपल्या जीवाची पर्वा न करता लढा दिला. ज्यांनी आपले जीव देशासाठी अर्पण केले ते एका जातीचे किंवा धर्माचे नव्हते तर ते होते फक्त भारतीय.

स्वातंत्र्यानंतर आज जे चित्र पहावयास मिळत आहे ते खरोखरच चिंतनीय आणि काळजी करण्यासारखे आहे. आज आपण सर्व भारतीय असून देखील एकमेकांच्या विरोधात लढायच्या कारवाया करीत आहोत. जाती-जातीत आणि धर्मा-धर्मात तेढ निर्माण व्हावे अशी आपली वागणूक झाली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून माणसा-माणसातील भेदाभेद फार मोठ्या प्रमाणात फैलावत आहे. आज प्रत्येक व्यक्ती आपापल्या रंगाच्या झेंड्याखाली एकवटला जात आहे जे की भारताच्या भविष्यासाठी धोकादायक आहे. भगवे, निळे, हिरवे, पिवळे आदी अश्या या विविध रंगामध्ये आज माणूस विखरून जात आहे. त्यामुळे देशात एक काळजी करण्यासारखी बाब निर्माण होत आहे. ज्याला कोणत्याच रंगाचा झेंडा नाही तो कोणत्या तरी रंगाच्या झेंड्याच्या शोधात फिरत आहेत. ज्यांच्या हातात देशाची, राज्याची पर्यायाने गावाची प्रगती करायचे आहे ते देखील आपला रंग कोणता हे पाहून वागत आहेत. कशी होईल मग प्रगती? जर प्रत्येकजण आपलाच

रंगातील माणूस पाहत असेल तर ज्यांचे कुणी वालीच नाहीत ते कुठे जावे? हा फार मोठा प्रश्न पडला आहे.

अमुक ठिकाणी जा आपला माणूस आहे, तुझे काम चटकन पूर्ण होईल असे सहज वाक्य आपण ऐकतो. यातून काय अर्थबोध होईल? आज देशात असेच चालले आहे म्हणून सर्वसामान्य लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. जोपर्यंत ह्या रंगांचा प्रभाव राहील तोपर्यंत या देशाची प्रगती अशक्य आहे असे वाटते. कारण सर्वसामान्य लोकांचा विचार होणे अशक्य आहे. आपल्या माणसाचे काम कराच त्यासोबत इतरांचे काम देखील प्राधान्य देऊन केल्यास बरेच प्रश्न सुटू शकतात. येणारा काळ अजून अवघड आणि क्लिष्ट होणार आहे. म्हणून रंगात विखुरलेला माणूस एकत्र आणल्याशिवाय काही खरे नाही. सर्वांच्या मनात देशप्रेम आणि देशाभिमान जागे करणे अत्यंत महत्वाचे आहे. शाळाशाळामधून खास करून काही कार्यक्रमाची निर्मिती करून त्याद्वारे लोकांपर्यंत सर्वधर्मसमभावची संकल्पना घेऊन जाणे आवश्यक आहे. शाळेत विशेष करून मुलांच्या मनात एकतेची भावना निर्माण झाल्यास भविष्यात त्याचा फायदा होऊ शकतो. एक चांगला नागरिक तयार झाला तरच देशाची प्रगती शक्य आहे.

मात्र जातीभेदाचे बाळकडू कुटुंबात आणि समाजात मिळाल्यास त्यांचे दोष कोणाला देऊ आणि ते दोष कसे दूर करणार? हा एक मोठा प्रश्न पडतो, ज्याचे उत्तर शोधताना डोके चक्रावून जाते. म्हणून सुज्ञ आणि समजदार आपल्या सर्वांना एकच विनंती की कुटुंबात, समाजात ही विषमता पसरणार नाही याची काळजी घेऊ या आणि अखंड भारत घडवू या.

# जन्म मृत्यू आणि विवाह नोंदणीचे महत्व

युनिसेफच्या एव्हरी चाईल्ड ब्राईट ईनेकविट्स अँड  बर्थ रजिस्ट्रेशन या नुकतेच प्रकाशित करण्यात आलेल्या 161 देशातील आकडेवारी विश्लेषणाचा अहवालानुसार भारतात प्रत्येक तीन मुलामागे एकाच्या जन्माचे कोणतीही नोंद नसते.  पाच वर्षाखालील अशा अनोंदणीकृत मुलांची संख्या तब्बल 71 दशलक्ष असून जागतिक पातळीवर हीच संख्या दोनशे तीस दशलक्ष अशी आहे. यानुसार भारतात जन्म नोंदणीचे प्रमाण 41 टक्के आहे जी की जगात सर्वात कमी आहे. भारतातील हिंदू व मुस्लिम या दोन सर्वाधिक लोकसंख्येच्या समुदायात जन्म नोंदणीचे प्रमाण सर्वांत कमी असून याच्या तुलनेत अल्पसंख्यांक जैन व शीख समुदायात प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे. जन्माची नोंद करणे ही बाब अधिकाराहून अधिक आहे. मुलांना त्यांचा अधिकार नाकारला जाणार नाही, याची हमी आहे, असे युनिसेफच्या उपकार्यकारी संचालक गीताराव गुप्ता यांनी म्हटले आहे. युनिसेफने प्रकाशित केलेला अहवाल तमाम भारतीयांसाठी निश्चितच अभिमानास्पद नाही. जन्म नोंदणीचे प्रमाण एवढे कमी का होत असेल? यावर काही उपाय करता येतील का? याविषयी देशपातळीवर चर्चा, सभा, सल्लामसलत होऊन या अनुषंगाने विचार करणे योग्य वाटते.

जगाच्या तुलनेत भारतात जन्म नोंदणीचे प्रमाण अत्यंत कमी असण्याची अनेक कारणे आहेत. ज्यामुळे देशातील जनता या बाबीकडे दुर्लक्ष करते, कानाडोळा करते.

जनतेचे अज्ञान - भारतात सर्वात जास्त अज्ञानी, निरक्षर लोकांचे वास्तव्य आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही. याच अज्ञानामुळे जनतेला जन्मनोंदणीचे महत्व लक्षात येत नाही. आणि ते या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. जर कधी या विषयाच्या संदर्भात काम पडले तर या जन्म नोंदणीची आठवण येते. तसेच जन्म नोंदणीला म्हणावे तसे महत्त्वाचे स्थान देण्यात आले नाही.

वयाची सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलास पहिल्या वर्गात प्रवेश दिला जातो. मात्र प्रवेश देताना जन्म नोंदणी कार्यालयातील प्रमाणपत्राकडे पालक आणि शाळा सोयीस्करपणे दुर्लक्ष करतात, असे बहुतांश ठिकाणी घडते. मुलास शाळेत प्रवेश देताना पालकांनी मुलांची जी जन्म तारीख सांगेल तीच त्याची जन्मतारीख आयुष्यभर सोबत जोडली जाते. ग्रामीण भागात तर पालक शिक्षकांनाच विचारतात आणि अंदाजित तारीख ठरविण्याचे प्रकार सध्या नाही. मात्र वीस-पंचवीस वर्षापूर्वी नक्कीच घडल्याची अनुभव ऐकण्यास मिळतात. म्हणूनच बहुतांशवेळा शाळा जून महिन्यात उघडली जाते. तेव्हा अंदाजित तारीख टाकताना जून महिन्यातीलच तारीख घेतली जाते. त्यामुळे एकतर मुलाचे वय सहा वर्षे पूर्ण होतात आणि सर्वाच्या समस्या संपुष्टात येतात. त्याऐवजी जन्म नोंदणी प्रमाणपत्राच्या आधारावर प्रवेश देण्याची प्रक्रिया बंधनकारक केल्यास बऱ्याच समाधानकारक गोष्टी घडू शकतात.

शासनाने नुकतेच शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 ची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. ज्यात पालकांनी आपल्या पाल्यांच्या जन्माबाबत स्वयं घोषणापत्र दिल्यानंतर त्यांच्या पाल्यास वयानुसार वर्गात थेट प्रवेश देणे शाळांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे त्यामुळे परत एकदा या जन्म नोंदणीला दुय्यम स्थान दिल्यासारखे वाटते. तर थेट वर्गात प्रवेश देण्याची मुभा मिळाल्यामुळे बहुतांश पालक आपल्या पाल्यांचे खरे वय लपवून त्यास खालच्या

वर्गात प्रवेश घेण्याकडे त्यांचा कल वाढत आहे. आपली पाल्य जास्तीत जास्त काळ शाळेत कशी राहतील? आणि शासनाच्या विविध योजनेचा लाभ कसा उठविता येईल? या दृष्टीनेही काही पालक नक्कीच विचार करत असतील तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे निश्चितच नसेल. त्यास्तव जन्म नोंदणीचे प्रमाण वाढवायचे असेल तर मुलांचे नाव शाळेत प्रवेश करताना त्यासोबत जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र बंधनकारक केल्यास याचे प्रमाण निश्चितपणे वाढू शकेल आणि गैरमार्गावरसुद्धा आळा बसू शकेल

जन्म नोंदणी कार्यालयाकडून होणाऱ्या जन्म प्रमाणपत्राला सध्या महत्त्वाचे असे स्थान न दिल्या गेल्यामुळे या बाबीकडे दुर्लक्ष झाले आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. मूल जन्माला आल्यानंतर एका महिन्याच्या आत जन्म नोंदणी कार्यालयात त्याची नोंद करणे आवश्यक आहे. मात्र बहुतांश पालक या बाबीकडे कानाडोळा करतात कारण त्यांना या नोंदणीची कुठेही गरज पडत नाही किंवा त्याचे महत्त्व माहीत नाही. त्याचसोबत शासनाच्या उदासीन धोरणामुळेसुद्धा या जन्म नोंदणीचे प्रमाण वाढताना दिसून येत नाही. बऱ्याच वेळा पालक आपल्या पाल्याची जी तारीख सांगतील तीच तारीख जन्म पत्रावर टाकून सक्षम अधिकारी सही व शिक्का मारून मोकळे होताना दिसून येतात. मात्र त्यांची सरकारी दस्तऐवजात ठराविक वेळात नोंदणी झाली आहे किंवा नाही याची साधी खातरजमा केली जात नाही ही फार मोठी शोकांतिका आहे. पालकांना ज्या वेळेस त्या जन्म प्रमाणपत्राची गरज भासते त्याच वेळेस ते या कार्यालयाकडे फिरकतात. ज्याचे काम पडत नाही ते इकडे येतच नाहीत आणि नोंदणी करीत नाहीत. त्याचे काम जर सरकारी सक्षम अधिकाऱ्यांनी रोखून ठेवले असते तर कदाचित लोकांना त्याचे महत्त्व कळाले असते. परंतु ही बाब छोटीसी आहे त्यासाठी जनतेला वेठीस धरल्यासारखे होईल म्हणून कोणीही ही बाब गांभीर्याने घेत नाही हेही तेवढेच सत्य आहे. त्यासाठी पालक आणि सरकारी सक्षम अधिकारी दोघांनी मिळून या जन्म नोंदणीचे महत्व लक्षात घेतले तर येणाऱ्या काळासाठी ही एक चांगली सोय होऊ

शकते. आज आपण प्रत्यक्ष अनुभव घेत आहोत की 20 ते 30 वर्षापूर्वी कसल्याच प्रकारची नोंदणी केल्या जात नव्हती त्यामुळे किती समस्या निर्माण होत आहेत? जुने कागदपत्र मिळवताना ते कसे मिळतात आणि त्यासाठी कसा खटाटोप करावा लागतो? याचा अनुभव जसा आपणाला येतो तसा अनुभव आपल्या पुढच्या पिढीला येऊ नये हे लक्षात घेऊन जन्म नोंदणीचे महत्व सर्वांनी गरजेचे आहे असे वाटते.

जन्म आणि मृत्यू हे जीवनाचे दोन भाग आहेत, ज्याचा जन्म झाला त्याचा मृत्यू अटळ आहे, यात शंकाच नाही. त्यास्तव जन्म नोंदणीसोबत मृत्यूची नोंदणी करणेसुद्धा आवश्यक आहे. जन्मा एवढेच मृत्यूची नोंद ही महत्वाचीच आहे. कुटुंबातील एखादा व्यक्ती मृत्यू पावल्यानंतर त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळतो त्यामुळे त्या कुटुंबातील व्यक्ती ही मृत्यूची नोंद करण्याच्या मनःस्थितीत नसतो, हे सत्य आहे. मात्र त्याचे नातलग किंवा मित्र परिवारातील एखादा व्यक्तीने हे काम निश्चितपणे करू शकतील किंवा एका महीन्याच्या कालावधीत कुटुंबप्रमुख याची नोंदणी करू शकतात. याउपरही सरकारी सक्षम अधिकाऱ्याने संबंधित कुटुंबाची भेट घेऊन तशी नोंद घेण्याचे काम केल्यास ती नोंदणी पूर्ण होईलच शिवाय कुटुंबाचे सांत्वनसुद्धा होईल. मात्र प्रत्यक्षात असे घडताना दिसून येत नाही. मतदार याद्या कित्येकदा तरी नव्याने तयार केल्या जातात तरी त्यात मयत व्यक्तीचे नाव समाविष्ट असतेच असते हे असे का घडते? कदाचित सक्षम अधिकाऱ्यांना मतदार यादीतून नाव वगळण्यासाठी सक्षम पुराव्याची गरज भासते ते त्यांना मिळत नसेल. मात्र मृत्यु प्रमाण पत्र दाखल करून कुटुंब प्रमुखाला किंवा सक्षम अधिकाऱ्यांना हे काम सहजपणे करता येईल. त्याचसोबत मृत्यु प्रमाणपत्रानेच विविध ठिकाणी काम पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यास्तव जन्म नोंदणी सोबत मृत्यूची नोंद करणे ही महत्त्वाचे आहे हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

जन्म आणि मृत्यू एवढेच विवाहाची नोंदणी करणेसुद्धा गरजेचे आहे. मात्र या बाबीकडेसुद्धा आपण तेवढे लक्ष देत नाही. कारण या नोंदणीचा जीवनात कुठेही काम पडत नाही असे वाटते. तसेच शासनाने ह्या नोंदणीला ही महत्त्वाचे असे स्थान दिले नाही. त्यामुळे जनता या नोंदणीकडेसुद्धा साफ दुर्लक्ष करते. त्याचसोबत जनतेत याविषयी जागरूकता निर्माण केल्या गेले नाही. बहुतांश वेळा जीवनात आपणाकडे सक्षम नोंदणीचा पुरावा उपलब्ध होत नसल्यास अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. ज्यावेळी अडचण निर्माण होते त्याचवेळी अशा नोंदणीची आठवण येते म्हणजे तहान लागल्यावर विहीर खणण्यासारखे प्रकार घडतात.

लग्न होऊन सासरी आलेल्या नववधूचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे म्हणून प्रत्येकजण लग्नपत्रिका जोडतात आणि त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट केल्या जाते. ही प्रक्रिया अधूनमधून पहावयास मिळते. भारतातील विवाहाच्या बाबतीत कायद्यानुसार ज्या मुलीचे वय अठरा वर्षे पूर्ण आहेत तिचेच लग्न लावले जातात. तिचे लग्न झाले याचा अर्थ ती वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहे. मतदार म्हणूनसुद्धा वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली व्यक्ती पात्र समजली जाते. असा ढोबळ अंदाज बांधून ही प्रक्रिया पूर्ण होत असेल तर या सर्व प्रक्रियेला शासन कधी डोळसपणे बघणार आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. निवडणूक आयोगानेसुद्धा याकडे लक्ष दिल्यास काही महत्त्वपूर्ण बदल समाजात होऊ शकतात. ग्रामीण भागात आजही वयाची अठरा वर्षे पूर्ण न झालेल्या मुलीचे लग्न अगदी सर्रासपणे लावले जातात आणि लग्नपत्रिका जोडून ती मतदानास पात्र नसतानाही मतदार यादीत समाविष्ट केल्या जाते. निवडणूक आयोगाने यात लक्ष देऊन नवीन मतदारांचे नाव यादीत समाविष्ट करताना जन्म किंवा विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र बंधनकारक केल्यास लोकांचा नोंदणी करण्याकडे कल वाढू शकेल. यासोबतच विवाहाची नोंदणी करताना वर-वधू यांना वयाचा पुरावा दाखल करण्याची सक्ती केल्यास अनेक बालविवाह आपसूकच थांबविता येऊ शकतील. याबाबतीत काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी हा प्रश्न उचलून धरले तर भविष्यात समाजात

चांगला बदल दिसून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आजसुद्धा काही लग्न मंदिरात लावले जातात, काही अल्पवयीन मुलींना फूस लावून पळविले जाते आणि तिच्यासोबत लग्न केले जाते. अनैतिक संबंधातून ही काही अल्पवयीन मुलींची लग्न लावले जाते या व अशा अन्य गैरमार्गावर आळा घालण्यासाठी विवाह नोंदणी बंधनकारक करणे अत्यावश्यक आहे. नोंदणी कार्यालयाची संमती मिळाल्याशिवाय जे लग्न होतील ते सारेच अवैध ठरविण्यात येऊ लागली की विवाह नोंदणीचे महत्त्व नक्कीच वाढू लागेल.

मनुष्याच्या जीवनातील जन्म, विवाह आणि मृत्यू हे पुन्हा पुन्हा न घडणाऱ्या घटना आहेत. त्यामुळे त्याची योग्य वेळी नोंद करणे भविष्यासाठी हे महत्त्वाचे आहे हे सर्वांनी लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# मतदार जागृती आवश्यक

निवडणुकांमधील मतदानाचा टक्का वाढण्यासाठी मतदान सक्तीचा विचार होणे आवश्यक आहे असे सूतोवाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मतदान करणे हे प्रत्येक मतदारांचे आद्य कर्तव्य आहे. मात्र बरेच मतदार याविषयी गांभीर्याने विचार करताना दिसत नाहीत, हे प्रत्येक निवडणुकीमध्ये दिसून येते. गाव पातळीवरून देश पातळीचा विचार केल्यास ग्रामपंचायतीच्या म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी खूप वाढून राहते. तर त्यानंतर पंचायत समिती जिल्हा परिषद, विधानसभा आणि लोकसभा ह्या निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीला उतार लागतो. हे असे का होते? यावर कुठे तरी विचार व्हायला हवे. भारत लोकशाही प्रधान देश आहे. त्यामुळे येथे लोकांनी निवडून दिलेले व्यक्तीच राज्यकारभार करू शकतात. दर पाच वर्षांनी निवडणुका होतात आणि दर पाच वर्षांनी सत्तापालट होत असते. मात्र निवडणुकीच्या एकूण प्रक्रियेत एक बाब स्पष्ट होत नाही की, एकूण मतदारांच्या किती टक्के मतदान झाले तर ती निवडणूक वैध धरल्या जाते याविषयी निवडणूक आयोगाने कोणतेच निकष ठेवलेले नाही. अर्धेपेक्षा अधिक मतदारांनी मतदान केले नाही तरी त्याचा निकाल लावला जातो. तेंव्हा मनात प्रश्न येतो की, हे योग्य आहे काय? निदान एक तृतीयांश मतदारांनी तरी आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे असा एखादा नियम केल्यास मतदानाची टक्केवारी वाढ होईल असे वाटते. याविषयी शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच आग्रह धरला होता. ४० टक्के मतदान होते आणि त्यात २०-२२ टक्के मते घेणाऱ्यांनी

निवडून यायचे, ही कुठली सकस लोकशाही? लोकशाही बळकटी करण्यासाठी मतदारांनी आपले अमूल्य मतदान करणे आवश्यक आहे. त्याशिवाय देशाची प्रगती कसे शक्य आहे. काही लोक धोरणात्मक बाबींवर नेहमीच बोलत असतात, परंतु ते मतदानाला जात नाहीत. म्हणून प्रत्येक मतदार मतदान करावे म्हणून मतदानाची सक्ती करणे आवश्यक वाटते. मात्र यापूर्वी सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुजरातचे मुख्यमंत्री असताना, त्यांनी गुजरातमधील निवडणुकीत मतदान सक्तीचे करण्याची भूमिका घेतली व तसे विधेयकही विधानसभेत सादर केले होते. पण ही सक्ती तिथे अद्याप अंमलात येऊ शकलेली नाही. हे प्रकरण न्याय प्रविष्ट झाले. त्यामुळे सक्ती करण्यापेक्षा दुसरे काही उपाय करता येतील काय? यावर विचार होणे आवश्यक आहे.

मतदान प्रमाणपत्र

कोणत्याही लहान सहन कामासाठी जनतेला शासनाच्या कार्यालयात यावे लागते. जनतेचे कोणतेही काम पूर्ण करायचे असेल तर त्यास मतदान केले असणे बंधनकारक केल्यास मतदानाची टक्केवारी वाढू शकेल असे वाटते. त्यासाठी जेंव्हा जेंव्हा निवडणुका येतील तेंव्हा तेंव्हा मतदारांना मतदान केल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले आणि त्याच प्रमाणपत्राच्या आधारावर त्यास योजना देत राहिले तर मतदानाची टक्केवारी वाढेल आणि योग्य व्यक्ती निवडला जाईल असे वाटते. निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेवर एक नजर टाकल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात मतदानाची टक्केवारी चांगली आहे. शहरातील लोक विविध कारणांमुळे मतदानापासून वंचित राहतात. काही वेळा मतदारांची काही चूक नसते मात्र ते मतदार यादीतुन वेगळले जातात. बऱ्याच वेळा मयत आणि दुबार नावे यादीत राहतात त्यामुळे ही टक्केवारी घटते.

पैसेवाल्या माणसांची ही निवडणूक झाली आहे. सर्वसामान्य व्यक्तीला येथे अजिबात वाव नाही. एका घरातून एखादा व्यक्ती निवडून आल्यावर त्याना परत दुसऱ्या वेळी संधी असूच नये असे नियम असायला हवे. एखादा व्यक्ती सलग किती तरी वेळा निवडून येण्याचा विक्रम करतो हे त्याच्यासाठी चांगले आहे पण देशाच्या विकासासाठी काही चांगले नाही. एका व्यक्तीला एकदाच संधी मिळाली तर अनेक नवख्या तरुण पिढीला राजकारणात येण्याची संधी मिळू शकते. अन्यथा तेच ते चेहरे वंश परंपरेने व्यवस्थेत चिकटून राहतात. या गोष्टी देखील मतदान घटण्यामागे कारणे असू शकतात. मतदार मध्ये मतदान विषयी जागृती निर्माण करणे देखील गरजेचे आहे. भविष्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी निवडणूक आयोगाने काही ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे वाटते

# जगाला प्रेम अर्पावे

प्रेम या अडीच अक्षरी शब्दात जादुई शक्ती आहे. प्रेमाशिवाय जीवन जगणे अशक्यच नाही तर असंभव आहे. प्रत्येक व्यक्ती जीवनात कुणावर नाहीतर कुणावर जीवापाड प्रेम करतो. जन्म देणाऱ्या आई-वडिलावर सर्वांचेच प्रेम असते कारण ते जन्मदाते असतात. भाऊ-बहिणींचा एकमेकींवर अतूट प्रेम असते, हे आपण सर्वचजण जाणतो. संसारातल्या विविध नातेसंबंधात आपणाला पदोपदी प्रेम दिसून येते. त्याशिवाय संबंध टिकूच शकत नाही. क्रोधी,  रागीट किंवा तापट स्वभावाचा व्यक्तीलासुद्धा प्रेमाने जिंकता येते शत्रुचे मन प्रेमाने वितळवितात येते. प्रेमात एवढी प्रचंड शक्ती आहे की, त्याच्या स्फोटाने संपूर्ण जग हादरून जाईल. संपूर्ण मानव जातीचे आस्तित्व ह्या प्रेमामुळेच टिकून आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. जीवनातून प्रेमाला वजा केल्यास उरते काय तर फक्त भकासपणा. प्रेमामुळे काही गोष्टी आपणास शिकण्यास मिळतात. त्यातून काही बोध घेतल्यास नक्कीच आनंद मिळेल.

प्रेम हे खरेदी किंवा विक्री करून मिळणारी वस्तू नाही, हे सर्व प्रथम लक्षात घ्यावे. प्रेमात कसल्याच प्रकारची देवाण-घेवाण नसते अर्थात प्रेमात काही मोबदला मिळेल अशी अपेक्षा करणे साफ चुकीचे आहे. ज्या ठिकाणी प्रेमाच्या मोबदल्यात काही तरी मिळणे, परतफेडीची आकांक्षा असेल त्याठिकाणी खरे प्रेम बघायला मिळेल काय? ते प्रेमाचे एक सोंग असते. आई आपल्या मुलावर प्रेम करताना कसल्याच प्रकारच्या फळाची अपेक्षा ठेवत नाही. अपेक्षा ठेवून केलेले प्रेम म्हणजे निव्वळ दुकानदारीच होय. जिथे पैसा घ्यायचा माल द्यायचा एवढीच क्रिया होते. शुद्ध व पवित्र प्रेम कोणत्याच वासनेने गढूळ होत नाही. खऱ्या प्रेमाला लाभाच्या कल्पनेचा लवलेशही नसतो. साधी कल्पना ही त्यांच्या मनात येत नाही. त्यास्तव प्रेम केल्याने एक बाब प्रकर्षाने शिकायला मिळते ती म्हणजे आपल्या

आवडत्या व्यक्तीसाठी प्राण गेले तरी बेहत्तर परंतु त्यांचे रक्षण करतोच. बाजीप्रभु देशपांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रेमामुळेच शत्रूला रोखून धरले म्हणूनच ती खिंड पावन झाली.

यावरून प्रेम करणाऱ्याच्या जीवनात भय नावाची कोणतीच चीज राहत नाही. जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटाला निर्भयपणे तोंड देण्याची शक्ती ह्या प्रेमामुळेच निर्माण होते. " जब प्यार किया तो डरना" क्या ही धाडसी भावना तयार होते. त्यांच्याविषयी आपल्या मनात प्रीती आहे ज्यांचाविषयी आपल्या मनात प्रीती आहे, त्यांच्या विषयीची सारी भीती क्षणात नाहीसे होते. खरे प्रेम सर्व प्रकारच्या भयावर मात करीत असते. प्रेमाचा स्वभावच मुळी असा आहे की, मनातील संपूर्ण भीती नष्ट करण्यास मदत करते. एकमेकांच्या उत्कटतेमुळे प्रेमाची उत्कटता लक्षात येते. आपल्या पत्नीच्या प्रेमाचा उत्कटतेमुळे एका संताने सापाला दोर समजून त्याचा आधार घेतला. त्यांना त्या प्रेमात काहीही दिसत नव्हते. असे बोलल्या जाते की, याच प्रसंगातून ते पुढे संत झाले.

आपल्या मनात भय केव्हा निर्माण होते? आपण जितके संकुचित, स्वार्थी आणि क्षुद्र बनत जातो तितके आपल्या मनात भय वाढत जाते. चोराच्या मनात चांदण्याप्रमाणे मनात किंचितही जरी भय शिल्लक असेल तर आपण दुसऱ्यावर प्रेम करूच शकत नाही. कारण प्रेम आणि भय एकाच हृदयात एकत्र नांदू शकत नाहीत. भक्त प्रल्हाद यांचे भगवंतावर निस्सीम प्रेम होते त्यामुळे वडील हिरण्यकश्यप यांनी दिलेल्या कठीणातल्या कठीण शिक्षेलासुद्धा ते न डगमगता, न घाबरता हसतमुखाने सामना केला.

कुणी आपल्या जीवनात अजुन एक बाब घडते ती म्हणजे एकमेकांत असलेली स्वच्छ व निर्मळ एकनिष्ठता. आपले प्रेम हे सर्वोच्च आहे अशी भावना जोपर्यंत तयार होत नाही तोपर्यंत खरे प्रेम निर्माण होणे शक्य नाही. प्रेमामध्ये

असलेली विश्वासहर्ता अन्य कुठेच बघायला मिळत नाही. याच विश्वासाच्या बळावर जीवनातील अनेक संकटांना निर्भयपणे तोंड देता येऊ शकेल. परंतु जे प्रेमी प्रेमात विफल झाल्याने आत्महत्या करतात, आपल्या अमुल्य जीवांचे बळी देतात, ते कसले आले प्रेमीयुगल? यांचे एकमेकांवर खरोखर प्रेम नसतेच मुळी, ते वरवरचे असते. संसाराचा गाडा चालविताना उभयंताचे एकमेकावर प्रेम म्हणजेच एकनिष्ठता. एकमेकांवर विश्वास नसेल तर घरात चालत असलेली धुसफूस चव्हाट्यावर यायला वेळ लागणार नाही. म्हणूनच प्रेमामुळे इतरांचा विश्वास संपादन करणे सोपे आहे.

आपण आपल्या स्वकियावर, नातलगांवर, मित्रांवर प्रेम करीत असतो.परंतु असेच प्रेम दीन-दुबळया, दिव्यांग, असहाय्य लोकांवर केल्यास त्यांच्या जीवन जगण्याची आस निर्माण होते. दिव्यागांना मिळालेल्या प्रेमाच्या आधारावरच ते जीवनात ताठपणे उभे राहू शकतात. असहाय किंवा पंगू लोकांना प्रेमाने हाक दिल्यास ते तनाने नाही परंतु मनाने निश्चित पळू शकतात. याबाबतीत संस्कृतमधील श्लोक म्हणजे मुकं करोती वाचालम् पंगूम लंगयते गिरीम बरेच काही सांगून जाते. आंधळया माणसाची पांढरी काठी आणि लंगड्या माणसाचे पाय बनून त्याला योग्य रस्ता दाखवून दिशा देण्याचा एकदा तरी प्रयत्न जरूर करावे.सव्वाशे कोटी लोकांच्या देशात आपले सारे लक्ष तरुण व तरुणीच्या प्रेमाकडेच जास्त जाते. यापेक्षा समाजातील गोरगरीब, पीडित, असहाय्य, दिव्यांग आणि अनाथाना प्रेमाचा आधार देणे हाच खरा मानव जातीचा धर्म आहे. सिंधुताई सपकाळ हे नाव आता जगाच्या पाठीवर प्रसिद्ध झाले ते फक्त अनाथांवर केलेल्या प्रेमामुळेच. परम पूज्य साने गुरुजी आपल्या कवितेत हाच संदेश सांगितला आहे की

"खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे "

# स्मार्टफोनचा विळखा, वेळीच ओळखा

अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. पण कालांतराने या मूलभूत गरजामध्ये अजून कांही वस्तूची वाढ होत गेली त्यात प्रामुख्याने मोबाईलचा समावेश करणे अगत्याचे आहे. आज माणसाला एक वेळ अन्न, वस्त्र किंवा निवारा यांची कमतरता असेल तर चालून जाईल मात्र खिशात मोबाईल नसेल तर ती व्यक्ती जिवंत राहू शकत नाही, अशी परिस्थिती सर्वत्र निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आज देशातील निम्यापेक्षा ज्यास्त लोकांकडे मोबाईल उपलब्ध आहे. तसेच जास्तीत जास्त लोक हे स्मार्टफोनधारक आहेत. जिओ सारख्या कंपनीने इंटरनेटची सुविधा कमी दरात उपलब्ध करून दिल्यामुळे इंटरनेट वापर करणाऱ्या लोकांची संख्या सुध्दा गेल्या एका वर्षात भरमसाठ वाढली. इतर कंपनीने देखील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी तोडीसतोड म्हणून वेगवेगळी ऑफर लोकांना देऊ केले. त्याचा एक परिणाम असा झाला की, सोशल मीडियातील फेसबुक, व्हाट्सअप, ट्विटर इत्यादी सारख्या क्षेत्रात यूजरची संख्या वाढली. ही बाब व्यापाऱ्यांच्या दृष्टिकोनातून खुप चांगली असेल कदाचित. मात्र त्याचे दूरगामी परिणामाचा विचार केल्यास याचा प्रभाव सर्वच क्षेत्रात झपाट्याने दिसून येत आहे. ब्ल्यू व्हेल सारख्या गेमने अनेक शाळकरी किशोर मुलांचे बळी घेतले आहेत. अश्या गेमपासून मुलांना दूर ठेवणे आवश्यक आहे असे बोलण्यापूर्वी त्यांच्या हातात चोवीस तासासाठी मोबाईल असणे हेच घातक आहे. कारण ब्ल्यू व्हेल गेमच नाही तर इतरही अनेक तंत्रज्ञानचे ऍप्स या मोबाईलमध्ये आहेत, ज्यामुळे ही शाळकरी किशोर वयातील मुले काही कळण्याच्या आत

हाताबाहेर जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज बरेच तरुण-तरुणी मोबाईल पाहिजे म्हणून घरात हट्ट करतात. मोबाईल ते ही स्मार्ट फोनच पाहिजे म्हणून मागणी करतात आणि मागितल्यानंतर मोबाईल मिळाले नाही तर अगदी टोकाची भूमिका घेण्यास देखील मागेपुढे पाहत नाही. अश्या वेळी पालक चिंताग्रस्त होतात. काय करावे आणि काय नाही हे त्यांना कळत नाही. मोबाईलपेक्षा आपल्या पाल्यांचे जीवन त्यांना अनमोल वाटते म्हणून पालक मुलांना मोबाईल घेऊन देतात. तरी ही अधुनमधून मुलांना गोडीगुलाबीने बोलून, दोन-चार दिवसांनी त्यांचे मोबाईल तपासून पहाणे आवश्यक आहे. समाजात अनेक लबाड माणसे आहेत जे की, अश्या किशोरवयीन मुलांना वेगळया काही प्रकरणात गुंतवून ब्लॅकमेल करतात. हे सहन न झाल्याने मुले आत्महत्या करण्याकडे वळु शकतात. म्हणून त्यांच्याशी संपर्कात राहणे आवश्यक आहे. स्मार्टफोन आल्यापासून लोकां-लोकांतील संवाद देखील कमी झाले असून स्मार्टफोनवरील चॅटींग फार मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. रात्री बारा वाजेपर्यंत तर काही जण पहाटेच्या चार वाजेपर्यंत मोबाईलवर चॅटींग करताना दिसून येत आहेत. ह्या मोबाईल चॅटींगचा रोग सर्वत्र पसरलेले आहे. घरात ही आत्ता एकमेकात बोलणे खुप कमी झाले आहे. जो तो सोशल मीडियात चॅटींग करण्यात व्यस्त झाला आहे. त्यामुळे काही ठिकाणी कौटुंबिक वाद झाल्याचे देखील बातम्या ऐकण्यात आले आहेत. यावरून आपण विचार करू शकतो की, स्मार्टफोन किती गरजेची वस्तू बनली आहे. सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांकडे स्मार्टफोन अत्यावश्यक आहे, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शासनाकडून येणाऱ्या सर्व सूचना आत्ता थेट व्हाट्सअपच्या माध्यमातून मिळत आहेत. त्यामुळे त्यांना स्मार्टफोनचा वापर करणे गरजेचे बनले आहे. एखादी माहिती बघितली नाही की, त्याचा फटका कर्मचाऱ्यांना नक्की बसतोच, हे सत्य असले तरी पण वास्तव काही वेगळेच दर्शविते. कार्यालयीन कामासाठी म्हणून जी स्मार्टफोनची सुरुवात झाली त्याचे त्यानंतर

करमनणुकीचे साधन केंव्हा बनले हे त्यांना देखील कळले नाही. आज अनेक कर्मचारी या स्मार्टफोनच्या संपूर्ण आहारी गेले असुन कार्यालयीन वेळात मोबाईलवर चॅटींग करणे आणि कॅण्डी क्रॅश सारखे गेम खेळत बसल्याचे चित्र अनेक ठिकाणी जनतेला पाहायला मिळते. त्यामुळे शासनानी कार्यालयात या स्मार्टफोनचा वापर करण्यावर बंदी घालायला हवी असे जनतेनी मागणी केल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. माणसाला ज्याप्रकारे बिडी ओढण्याची किंवा पान-तंबाखू खाण्याची सवय असते अगदी तशीच काहीशी सवय स्मार्ट फोनची झालेली आहे. तलब आल्यावर व्यसनी माणसाला जसे राहवत नाही तसे एखाद्या दिवशी सोबत स्मार्टफोन नसेल किंवा इंटरनेट सुरळीत नसेल तर माणसाचा जीव कासावीस होतो. पूर्वी जसे येथे धूम्रपान करण्यास सक्त मनाई आहे असे फलक जागोजागी दिसत होते त्याऐवजी आत्ता येथे स्मार्ट फोन वापरण्यास मनाई आहे असे फलक जागोजागी लवकरच दिसतील असे वाटते. काही लोकांना आज कोणत्याच गोष्टीची गरज भासत नाही फक्त हातात स्मार्ट फोन असावा आणि त्यात अनलिमिटेड डाटा असावा मग घरात आटा नसेल तरी चालते. त्यांचा दिवस आणि रात्र कसे संपले हेच त्यांना कळत नाही. बहुतांश जणाना या स्मार्टफोन मुळे जग खूप जवळ आले आहे असे वाटत आहे मात्र याचा अति वापर कधी ना कधी मानवासाठी घातक ठरणार आहे, हे मात्र खरे आहे. शासन एकीकडे डिजिटल इंडिया करण्यास पुढे पाऊल टाकत आहे, आहे मात्र या स्मार्टफोनच्या अति वापरामुळे अनेक नवनवीन समस्या निर्माण होत आहेत आणि भविष्यात देखील निर्माण होतील. म्हणून शासनानी कायदा करण्याच्या अगोदर प्रत्येक नागरिकांनी स्मार्टफोन बाबत जागरूक होणे आवश्यक आहे. नविन तंत्रज्ञानामुळे जीवनाचा जेवढा विकास होतो असे वाटते तेवढाच भकास देखील होतो हे ही नेहमीसाठी लक्षात असू द्यावे. म्हणून म्हणावेसे वाटते स्मार्टफोनचा विळखा, वेळीच ओळखा.

# साहित्यसेवा हेच खरे काम

साहित्यासाठी भाषा खुप महत्त्वाची आहे. भाषेचा विकास साधण्यासाठी साहित्यातून बोलीभाषेचा वापर करायलाच हवे. बोलीभाषेतून मग प्रमाण भाषेकडे वाटचाल करता येते. आपले विचार व्यक्त करण्यासाठी आपण वेगवेगळया प्रकारचे कौशल्य वापरत असतो. काही जण आपल्या मनातील विचार भाषणाच्या माध्यमातून व्यक्त करतात तर काही लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करतात. भाषणामधून जे व्यक्त होते ते संग्रही ठेवणे जरा कठीण जाते मात्र लिखित स्वरूपातील विचार चिरकाल टिकून राहतात. आज आपण संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर यांच्या काळातील साहित्य लिखित स्वरुपात असल्यामुळे वाचन करू शकतो. कागदाचा शोध लागण्यापूर्वी माणसे तोंडातोंडी माहिती लक्षात ठेवत असत. पाठांतर करण्यावर जास्त भर राहत असे. एकाजवळ असलेली माहिती दुसऱ्यांजवळ तोंडीच जात असे, त्यास गुरुकुल पध्दत असे म्हटले आहे. अश्मयुगीन काळातील लोक झाडाची पाने, साल आणि दगड गोट्याचा वापर करून काही नोंदी करत असत. काही कालावधी उलटल्यानंतर कागदाचा शोध लागला आणि लिखित साहित्याला चांगले दिवस बघायला मिळाले. प्रसिध्द कवयित्री बहिणाबाई चौधरी अशिक्षित होत्या मात्र त्यांचे कवन अप्रतिम होते. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते पण त्यांच्या नात्यातील एका व्यक्तिने ते सर्व लिहून ठेवले म्हणून आज ते साहित्य आपणास वाचायला मिळत आहे. महाराष्ट्रातील अनेक संतानी त्यांच्या प्राकृत मराठी भाषेत आपले साहित्य लिहून ठेवले म्हणून आज ते सर्व साहित्य आपणास दिशा देण्यासाठी खुपच उपयोगी ठरत आहेत. त्यांनी स्वतःच्या प्रसिद्धिसाठी नाही तर लोककल्याणासाठी साहित्य लिहून ठेवले. साहित्यात अनेक प्रकार आहेत जसे

की, कविता, कथा, चारोळी, ललित आणि वैचारिक लेख इत्यादी. अश्या अनेक माध्यमातून व्यक्ती आपले विचार जतन करू शकतो. भारतीय परंपरेत असे अनेक साहित्यिक मंडळी होऊन गेले त्यांच्या नावाची यादी करीत बसलो तर कागद अपूरे पडेल. त्यांनी प्रसिद्धिची हाव न ठेवता विपुल साहित्य लिहून ठेवले म्हणून मराठी साहित्य आज समृद्ध बनले आहे, एवढे मात्र खरे आहे. आज साहित्याची काय स्थिती आहे किंवा साहित्य किती जतन केल्या जात आहे? तर याचे उत्तर म्हणजे आज साहित्य विपुल प्रमाणात तयार होत आहे आणि वेगवेगळया माध्यमातून जतन केल्या जात आहे. मात्र पूर्वीप्रमाणे दर्जेदार साहित्य निर्माण होत नाही अशी खंत अधुनमधून ऐकायला मिळते. साहित्य निर्माण करणे हे येरागबाळयाचे काम नाही. खुप शिक्षण घेतलो म्हणजे साहित्य निर्माण करता येते असे मुळीच नाही. साहित्य निर्माण करण्यासाठी स्वतःजवळ तशी प्रतिभा असावी लागते, त्यासाठी वर्षानुवर्ष तपश्चर्या करावी लागते, नविन शिकण्याची जिद्द ठेवावी लागते, अपार मेहनत करण्याची तयारी असावी लागते, या सर्वासोबत विनम्रता असणे आवश्यक आहे तरच आपले साहित्य दर्जेदार निर्माण होते. आज प्रत्येकजण प्रसिध्दीच्या लालसेपोटी अक्षराला अक्षर जोडून, यमक जुळवून साहित्य तयार करीत आहेत. लगेच त्यास स्थानिक वृत्तपत्रामधून प्रसिध्दी मिळाले की झाले साहित्यिक. लगेच आपल्या नावसमोर किंवा नावाखाली बिरुदावली मिरवण्यास तयार. हे तर काहीच नाही काही साहित्यिक मंडळी इतरांचे साहित्य आपल्या नावावर प्रकाशित करून स्वतःची वाहवा मिळवितात. त्यामुळे ते खरोखरच साहित्यिक होतात काय? हा प्रश्न सुटत नाहीच. आजकाल सोशल मीडियामुळे खुप साहित्य तयार करता येत आहे आणि अनेक साहित्य जतन करून ठेवता येत आहेत. म्हणून आपले साहित्य प्रसिध्द व्हावे म्हणून लेखन न करता आपल्या मनाच्या समाधानासाठी पहिल्यांदा लिहिण्याचा प्रयत्न करावे. मनोरंजनातून लिहिलेले साहित्य दर्जेदार बनते. त्यानंतर लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी लिहावे म्हणजे आपल्या साहित्याला आपोआप

प्रसिध्दी मिळेल. जे जे आपणासि ठावे, ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनी सोडावे, सकळजन या उक्तीनुसार सर्व लोकांना काही बाबी कळाव्यात म्हणून साहित्य निर्माण करावे. स्वतःच्या नावाच्या प्रसिध्दीसाठी जो लिहितो तो मुळात लिहित नसून आपला स्वार्थ शोधत असतो. म्हणून साहित्यिक मित्रांना माझी नम्रतेची विनंती आहे की प्रसिध्दीसाठी कधी ही साहित्य लिहू नका. आपल्या लेखनीद्वारे समाजाचा, गावाचा, राज्याचा त्याचप्रमाणे देशाचा विकास होईल असे साहित्य निर्माण करणे आवश्यक आहे. जातीजातीत किंवा धर्माधर्मात तेढ निर्माण होईल असे कोणतेही लेखन प्रसिध्दीच्या मोहापायी प्रकाशित करू नये. त्यामुळे आपणास तर त्रास होतोच शिवाय आपल्यामुळे इतरांना देखील त्रास होऊ शकतो. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात की, शब्द हे तलवारी सारखे धारदार शस्त्र आहे, जरा जपून वापरा. शब्दाने मन जसे जोडली जातात तसे तोडली देखील जातात. तेंव्हा चला प्रसिध्दीची जरा देखील आस न धरता निर्भेळ साहित्याची सेवा करूया आणि आपले साहित्य आपल्या नंतर येणारी पिढी अभ्यासेल असे तयार करू या.

# आई असावी जिजाऊसारखी

कुटुंबातील सर्वात महत्वाची व्यक्ती म्हणजे आई. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी असे म्हटले जाते खरोखरच ज्यास आई नाही त्यालाच वरील ओळीचा अनुभव येईल. आईंची महती शब्दात व्यक्त करणे कठिण आहे. एक कवी आईला आपल्या कवितेत प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई असे संबोधतो. आपल्या जीवनाला वळण देणारी, आपले जीवन संस्कारक्षम करणारी म्हणजे आई. वडिलांचे संस्कार आपणास धाडसी करतात तर आईचे संस्कार आपणास मायाळू बनवतात. आईच्या वागणुकीवर मुलांचे वागणे अवलंबून असते. ज्या घरातील आई ही उद्योगी, सतत क्रियाशील, प्रेमळ, इतर लोकांना मदत करणारी असते त्यांची मुलेसुद्धा त्याच वृत्तीची तयार होतात. या गोष्टीचा आपण कधीही विचार न करता लहान मुलांसमोर घरात वावरत असतो. लहान मुले टीप कागदाप्रमाणे प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करतात आणि त्याचे अनुकरण देखील करतात. प्रत्येक मुलांची कुटुंब ही पहिली शाळा आहे तर आई ही त्यांची पहिली शिक्षिका. वडील म्हणजे शाळेचे मुख्याध्यापक समजू या. कुटुंबामधून मुलांना प्रत्येक गोष्टीचे संस्कार नकळत होत राहते. संस्कार जाणीवपूर्वक करता येत नाही मात्र तसे जाणीवपूर्वक वर्तन केल्यास मुलांवर नक्की फरक पडतो. कधी कधी आपण लहान मुलांसमोर नकळत खोटे बोलतो मग मुले ही खोटे बोलण्यास सुरुवात करतात. खोटे बोलू नका अशी आपली शिकवण असते आणि आपणच जर मुलांसमोर खोटे बोलत असू तर त्याचा खरोखर चांगला परिणाम बघायला मिळेल काय? अर्थात याचे उत्तर नाही असेच येते. कुटुंबातील शिक्षण हीच मुलांची खरी प्रगती दर्शवित असते. म्हणून तर शिकलेली आई घरादाराला पुढे नेई असे म्हटले जाते. संस्कृत मध्ये एक श्लोक आहे

'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' अर्थात एखाद्या वेळी कुपुत्र म्हणजे वाइट मुलगा जन्मास येऊ शकतो मात्र कुमाता म्हणजे वाइट आई जन्मास येणे अशक्य आहे. प्रत्येक आई आपल्या मुलांविषयी चांगले तेच पाहते.

जगात असे अनेक उदाहरण आहेत ज्या ठिकाणी आईच्या सहवासामुळे ते व्यक्ती महान झाले. ज्यात पहिले नाव येते अर्थात साने गुरुजी यांचे. यशोदा सारखी आई लाभली नसती तर कदाचित श्याम सारखा मुलगा पाहायला मिळाला नसता. तिच्या वागण्या बोलण्यातुन श्याम म्हणजे साने गुरुजी घडले. त्या नंतर दुसरे नाव आवर्जून घ्यावे वाटते ते म्हणजे विनोबा भावे. विनोबा लहान असताना त्यांची आई शेजारच्या लोकांना खूप मदत करीत असे. असाच एक प्रसंग विनोबाजी वर संस्कार करून गेला. विनोबाला सेवा, त्याग, सौहार्द हे संस्कार आपल्या आईकडून मिळाले. एकदा विनोबाच्या शेजारीच राहणारा एक जण आजारी पडला होता. अशा कठीण परिस्थितीमध्ये विनोबाच्या आईने शेजाऱ्यांना सहकार्य केले. ती आपल्या घरी जेवण बनवल्यानंतर शेजा-याच्या घरी जाऊन जेवण करून द्यायची आणि आजारी व्यक्तीची सेवाही करायची. एकदा विनोबाने आपल्या आईला विचारले, आई, तू किती मतलबी आहेस, स्वत:च्या घरचे जेवण आधी बनवतेस आणि नंतर शेजा-याचे जेवण तयार करतेस. आईने उत्तर दिले. तुला समजत नाही. विनोबा, शेजा-याचे जेवण आधी बनवले तर ते थंड होईल. त्यामुळे मी त्यांचे जेवण नंतर बनवते. दुसऱ्याला संकटाच्या वेळी सहकार्य करण्याचा हा भाव विनोबांनी नेहमीसाठी सांभाळून ठेवला आणि त्यांचे संपूर्ण जीवन याच भावाचे प्रत्यक्ष उदाहरण बनले. विनोबाच्या मनात प्रेम, माया हे संस्कार त्यांच्या आईच्या वागणुकीतून रुजत गेले. सहज केलेले वर्तन बरेच काही शिकवून जाते. यांच्या आई सारखी आपली आई आहे काय? मी श्यामची आई किंवा विनोबाच्या आई सारखी बनू शकते का? याचा कधी आपण विचार करीत नाही. समाजात अजून एकनआई आहे ज्यांच्याकडे सर्वच जण

आदर्श माता म्हणून पाहतो ते म्हणजे राजमाता जिजाऊ. जिजाबाई शहाजीराजे भोसले यांचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. राजमाता जिजाऊ ह्या मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री होत्या. सिंदखेडचे लखुजी जाधव हे जिजाबाईंचे वडील तर आईचे नाव म्हाळसाबाई होते. जाधव हे देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज होते. डिसेंबर १६०५ मध्ये जिजाबाईंचा शहाजीराजे यांच्याशी दौलताबाद येथे विवाह झाला. जिजाबाईंना एकूण आठ अपत्ये होती. त्यापैकी सहा मुली व दोन मुलगे होते. त्यांचा थोरला मुलगा संभाजी हा शहाजी राजांजवळ वाढला तर शिवाजी राजांची संपूर्ण जबाबदारी जिजाबाईंवर होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वतःवर घेतली. जिजाबाईंनी छत्रपती शिवाजीला रामायण आणि महाभारतातील शुर वीराच्या गोष्टी सांगितल्या. सीतेचे हरण करणाऱ्या रावणाचा वध करणारा राम किती पराक्रमी होता, बकासुराचा वध करून दुबळ्या लोकांची सुटका करणारा भीम किती पराक्रमी होता इत्यादी गोष्टी सांगितल्या. जिजाबाईंनी दिलेल्या या संस्कारांमुळेच छत्रपती शिवाजीराजे घडले. जिजाबाईनी नुसत्या याच गोष्टी सांगितल्या नाहीत तर आपल्या शेजारी बसवून राजकारणाचे धडेही दिले. शिवरायांच्या मनात कर्तृत्वाची ठिणगी टाकतानाच जिजाबाईंनी त्यांना राजनीतीही शिकविली. समान न्याय देण्याची वृत्ती आणि अन्याय करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा देण्याचे धाडस सुध्दा दिले. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणावर स्वत: बारकाईने लक्ष ठेवले. राजमाता जिजाऊमुळे छत्रपती शिवाजी राजे घडले. म्हणून प्रत्येक जण म्हणतो की आई असावी तर राजमाता जिजाऊ सारखी. ज्याना कुणाला अशी आई मिळते त्यांचे जीवन खरोखरच धन्य होते. आज राजमाता जिजाऊ यांची जयंती त्यानिमित्त कोटी कोटी प्रणाम.

# हे विश्वचि माझे घर

या भारतात बंधुभाव नित्य वसु दे यावेळी कानावर पडल्या की, मन शून्यात जाऊन विचार करायला लागतो. यापूर्वी अनेक संत, महात्मे, ऋषी, मुनी, समाजसुधारक मंडळीने लोकांमध्ये बंधुभावाची निर्मिती करून त्यांच्यात एकता साधण्याचा प्रयत्न केला आहे. आजही आपण त्यांच्या जयंती आणि पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांनी केलेल्या कामाचा मागोवा घेऊन त्याप्रमाणे वागण्याचा आणि जगण्याचा प्रयत्न करीत असतो. मात्र आज शिकून-सवरून शहाणी झालेली माणसेच समाजाच्या विकासासाठी घातक ठरत असल्याचे पावलोपावली निदर्शनास येत आहे. चार पुस्तके शिकलेली व्यक्ती एखाद्या समाजात असेल तर त्याच्या नात्यागोत्यातील, धर्मातील, जातीतील, समाजातील त्याच्याकडे फार मोठ्या आशाळभूत दृष्टीतून पाहतात. अशावेळी शिकलेला, शहाणा झालेला व्यक्ती त्यांना चांगली दृष्टी द्यायला हवे, त्यांची संकुचित वृत्ती राहणार नाही, सर्वधर्मसमभाव त्यांच्यात निर्माण व्हावे, असे मार्गदर्शन करायला हवे, मात्र सध्या असे चित्र दिसून येत नाही. त्यामुळे विविध जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या या भारत देशात अशांतता असल्यासारखे वाटत आहे. घराबाहेर पडलेला व्यक्ती सायंकाळी घरी सुखरुप परत येईल काय? याची शाश्वती मोठ्या शहरांतून लुप्त झाली आहे. लोकांचा एकमेकावर असलेला विश्वास आज पूर्णपणे संपला आहे. शाळेमध्ये घेतली जाणारी ' भारत माझा देश आहे ' ही प्रतिज्ञा शाळेत पूर्ण होत नाही असे बघायला मिळते. फक्त नावालाच ती प्रतिज्ञा आहे प्रत्यक्षात मात्र निराळेच आहे. कारण आज प्रत्येकजण

'मी' च्या कोशात गुरफटलेला आहे. त्याला मी आणि माझा यापलीकडे काहीच दिसेनासे झाले आहे. त्याला विश्वाची काळजी अजिबात नाही.

ज्यांना खरोखरच आपल्या कुटुंबाची आणि परिवाराची काळजी असते ते जगाची काळजी करत नाही का? काळजी करत असतील तर मग हा हिंसाचार किंवा दहशतवाद का फैलावत आहे? लोकं एकमेकांच्या जीवावर का उठत आहेत? एकमेकांविरुद्ध द्वेष भावना का पसरविल्या जात आहे? प्रत्येक व्यक्तीने आपली सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून आपले पाऊल उचलायला हवे. एकाने दगड मारला म्हणजे लगेच दुसराही आपल्या हातात दगड घेतात भिरवण्यासाठी. पण तत्पूर्वी एक सेकंद विचार करायलाच हवे. दगड फेकून ज्या बसेसचे काचा फुटत आहेत, बस किंवा इतर वाहने जे जाळल्या जातात किंवा नासधूस केली जाते त्या कृतीमधून आपणास काय मिळते? शेवटी नुकसान हे आपलेच होते ना ! कोणी काही सांगितले म्हणून भरकटून न जाता शांत डोक्याने विचार केल्यास अशी कृती नक्कीच घडणार नाही. जी व्यक्ती विश्वाला स्वतःचे घर समजते त्या व्यक्तीकडून मुंगीलासुद्धा त्रास होत नाही. परंतु आपली वृत्ती तशी बनतच नाही. लहानपणापासून आपण ज्या परिसरात आणि संस्कृती वाढलो त्याच्या भारी पगडा आपल्या मनावर पडलेला असतो. त्याच्या बाहेर पडणे फार जिकरीचे काम आहे. त्यासाठी बाहेरच्या जगात मूकपणे फिरत राहावे लागते आणे निरीक्षण करावे लागते. त्याचसोबत वाचन करून माहिती गोळा करावी लागते. तेव्हा कुठे आपणाला समोरचा व्यक्ती कळायला लागतो. कदाचित आपण याठिकाणी चुका करतो त्यामुळेच विश्वचि माझे घर ही संकल्पना कोणालाच समजत नाही. माझे कुटुंब जसे सुखात, आनंदी राहावे असे वाटते तसेच दुसऱ्याच्या कुटुंबाचा देखील विचार करायला हवे. ज्यादिवशी ही संकल्पना समजली तो दिवस आपला सोनियाचा असेल.

# मोबाईल महत्वाचे की शौचालय

जगभरातील सुमारे एक अब्ज जनता आज ही उघड्यावर शौचास जाते आणि भारत देश यात अव्वलस्थानी असल्याचे मत संयुक्त राष्ट्राच्या तज्ञानी पिण्याचे पाणी व स्वच्छतेसंबंधीच्या एका अभ्यासाचा शुभारंभ करताना नुकतेच व्यक्त केले आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या बाबतीत बांग्लादेश आणि व्हिएतनाम सारख्या अनेक देशानी समाधान कारक प्रगती केली आहे. सबसहारन आफ्रिकेतील 26 देशानीही याबाबतीत चांगली कामगिरी केली आहे. याबाबत संयुक्त राष्ट्रसंघाने चिंता व्यक्त केली आहे. उघड्यावर मलमूत्र विसर्जन केल्यामुळे अतिसार, आमांश, कावीळ आणि विषमज्वर यासारखे अनेक आजार होण्याची शक्यता असते, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या स्वच्छता व आरोग्य कार्यक्रमाचे समन्वयक ब्रूस गॉर्डन यांनी म्हटले आहे. उघड्यावर शौचास बसण्याचे गंभीर प्रभाव पाच वर्षाखालील मुलांवर जास्त प्रमाणात दिसून येतो आणि ही मुले दगावण्याची शक्यता जास्त असते. भारताची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. आजमितिला देशातील जवळपास अर्धे लोक म्हणजे 60 कोटी जनता ही उघड्यावर शौचास जाते. भारत हा खेडीप्रधान देश आहे. ग्रामीण भागात उघड्यावर शौचास जाणाऱ्याची संख्या भरमसाठ आहे. त्यापेक्षा शहरात कमी प्रमाणात आढळून येते. शहरात मोकळी जागाच उपलब्ध नसते त्यामुळे त्यांना शौचालायाचा वापर केल्याशिवाय पर्याय नसतो. याउलट ग्रामीण भागातील चित्र पहावयास मिळते. भरपूर मोकळी जागा उपलब्ध असल्यामुळे या भागातील लोकांना उघड्यावर शौच केल्याने काही वाटत नाही. भारत सरकार तर्फे निर्मलग्राम योजना राबवून अनेक गावात स्वच्छतेबाबत लोकांचे जनजागरण करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने

ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता अभियान ही चळवळच्या स्वरुपात राज्यभर राबवून लोकांच्या मनात स्वछतेविषयी जागृती करण्याचे काम केले आहे. गावागावात स्वच्छतेच्या बाबतीत स्पर्धा लावून सुंदर आणि स्वच्छ गावांना पारितोषिक सुध्दा दिल्या गेली. तरी सुध्दा ये रे माझ्या मागल्या म्हणीप्रमाणे ग्रामीण भागातील जनता आज ही उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्यात समाधान मानते. शौचालयाचा वापर करण्यास मागे पुढे पाहते. स्वच्छता आणि आरोग्य यांचा फार जवळचा संबंध असतो. याचा विचार करून प्रत्येक नागरिकांनी उघड्यावर मलमूत्र विसर्जन करून स्वतःसोबत समाजाचे आरोग्य बिघडणार नाही यांची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. कुटुंबातील एखादा व्यक्ती अस्वच्छतेमुळे आजारी पडला की, आपले डोळे उघडतात. आजारातून मुक्ती मिळविताना दवाखान्यात जो पैसा खर्च केल्या जातो तेवढ्या पैशात शौचालय बांधता आले असते याची जाणीव त्यावेळी होते. आजार बरा झाला की, शौचालय बांधकाम करण्याचे पुन्हा विसरून जातात. एकंदरीत आपले वागणे माकडाच्या गोष्टीतील माकड घर बांधायचे ज्याप्रकारे विसरतो त्याचप्रकारे घडत असते. शौचालय बांधणे आणि त्याचा वापर करणे या बाबीकडे लोक गंभीर्याने का लक्ष देत नाहीत, याची अनेक कारणे आहेत.

स्वच्छतेविषयी अनास्था - आपल्या जीवनात स्वच्छतेचे किती महत्त्व आहे? यापासून जनता कोसो दूर आहे. याउलट घराबाहेर जाऊन करावयाची क्रिया घरात केल्याने अस्वच्छता अजुन वाढते असा गैरसमज लोकांच्या मनात आज ही घर करून आहे. शौच करणे म्हणजे पोटातील सर्व घाण बाहेर टाकणे होय, मग ती क्रिया घरात करण्यापेक्षा घराबाहेर केलेलेच बरे असे लोकांना वाटते. परंतु तीच घाण विविध आजाराच्या स्वरुपात अधुनमधून घरात शिरकाव करते याची त्यांना पर्वा नसते. मोठी माणसे गावाबहेर जातील परंतु लहान मुले तर घराच्या आजूबाजूला शौच करतात. त्या घाण विष्ठेवर बसलेले माशा घरात येऊन अन्नावर

बसतात याकडे साफ दुर्लक्ष केल्या जाते. घराच्या आजूबाजूला लहान मुले शौचास बसण्याच्या कारणावरुन बऱ्याच ठिकाणी वाद, तंटे, भांडण सुध्दा होतात. महिला भगिनीना उघड्यावर शौचास जाताना अनेक समस्याना तोंड द्यावे लागते. घरातील महिलांना मानसन्मान मिळावे, त्यांची लाज राखली जावी याचा विचार करताना ती शौचास उघड्यावर जाऊ नये याचा मात्र कुणी विचार करीत नाहीत. वयोवृध्द लोकांना सुध्दा उघड्यावर शौचास जाताना त्रास होतो. थकलेले वय आणि चालणे होत नसल्यामुळे त्यांची सुध्दा कुचंबणा होते. विशेष करून पावसाळयात घरातील सर्वच सदस्याना उघड्यावार शौचास जाताना त्रास सहन करावा लागतो. तरी ही लोकांना शौचालयाचा वापर करावा असे वाटत नाही याचा अर्थ लोकांमध्ये याबाबतीत फारच अनास्था दिसून येते. त्यास्तव अजुन मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे अत्यावश्यक आहे, असे वाटते.

पैशाची कमतरता - दोन वेळेसचे खायाला पोटभर मिळत नाही तेंव्हा शौचालय कुठून बांधणार? असा सवाल ग्रामीण भागातील लोक सहजतेने बोलून जातात. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट व कठीण असल्यामुळे ते स्वतःसाठी चांगला निवारा बांधू शकत नाही तेंव्हा शौचालयाचा विचार त्यांच्या डोक्यात तरी कसा येईल? ग्रामीण भागातील बहुतांश जनता दारिद्रयरेषेखालील जीवन जगतात. त्यांचे पोट रोजच्या मोलमजुरीवर अवलंबून असते. त्याचसोबत त्यांच्या घरात खाणाऱ्याची तोंडे जास्त आणि कमाविणाऱ्याचे हात कमी यामुळे नेहमीच आर्थिक चणचण त्यांना सतावित असते. शौचालयापेक्षा त्यांना पोट भरण्याची काळजी जास्त असते. म्हणूनच ते या विषयाकडे म्हणावे तेवढे गांभीर्याने लक्ष देत नाहीत.याउपर ही अशा गरीब आणि दारिद्रयाच्या खाईत असलेल्या लोकांनी मनात आणले तर थेंबे थेंबे तळे साचे या म्हणीप्रमाणे पैशाची नियमित बचत करून शौचालय बांधू शकतात. आज ग्रामीण भागात ज्याच्या हातात मोबाईल नाही असे एक ही घर शोधूनही सापडणार नाही. त्यांच्या घरी शौचालय नाही मात्र मोबाईल

नक्कीच सापडेल. कारण आज लोकांना त्याची जास्त गरज वाटू लागली आहे. याविषयी जागतिक आरोग्य संघटनेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संचालिका मारिया नीरा यांनी म्हटले होते की, ग्रामीण भागात एका हातात मोबाईल आणि दुसऱ्या हातात लोटा असे विदारक चित्र दिसून येते. लोकांना शौचालयापेक्षा मोबाईल खुप महत्वाचे वाटते, त्यामुळे आपण निर्णय घ्यायचे आहे  मोबाईल महत्वाचे आहे की शौचालय ! भारतातील हे चित्र बदलण्यासाठी सरकार दरवर्षी नवनवीन योजना तयार करते. मात्र त्याची अंमलबजावणी योग्य होत नाही किंवा लोकांचा प्रतिसाद कमी असतो त्यामुळे ह्या योजना सपशेल आपटतात. यापूर्वी शौचालय नसणाऱ्या लोकांना ग्रामपंचायतीतून देण्यात येणाऱ्या विविध प्रमाणपत्रावर लाल शिक्का मारले जायचे. त्यामुळे त्यांचे कोणतेच सरकारी काम पूर्णत्वास जात नव्हते. पण मध्यंतरी ते बंद पडले आहे, पुनश्च ते चालू केल्यास लोक शौचालयाचा वापर करण्याकडे लक्ष देतील.शौचालय असणाऱ्या लोकांनाच शासनाच्या सर्व सुविधा मिळतील, निवडणुकीत सहभागी होता येईल, सरकारी नोकरी मिळेल अशा प्रकारच्या अटी टाकल्यास जनता याविषयाकडे गांभीर्याने लक्ष देतील. त्याचसोबत शासनाने प्रत्येक गावात निदान एक तरी मोबाईल शौचालयाची निर्मिती करावी. त्याचा नियमित वापर करीत राहिल्यास लोकांच्या मानसिकतेत हळूहळू तरी बदल होईल असे वाटते. लोकांच्या मानसिकतेत बदल होण्यासाठी अक्षयकुमार अभिनय केलेला शौचालय - एक प्रेमकथा प्रत्येकाने एकदा तरी आवर्जून पहावे. गावागावात आणि शाळाशाळामध्ये हा चित्रपट अवश्य दाखवायलाच हवे. प्रत्येकाने शौचालयाचा नियमित वापर करण्याचा संकल्प करावे. लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी गृहभेटी घेणे, कोपरा बैठका, समूह चर्चा, स्वयंसहाय्यता बचतगटासोबत बैठका, तरुण-तरुणी मंडळासोबत खुली चर्चा, तसेच भजनी मंडळ सोबत गावस्तरावरील चर्चा करून स्वच्छ भारत ; समृद्ध भारत बनविण्याचे स्वप्न पूर्ण करू या.

# मरावे परी अवयवरूपी उरावे*

जन पळभर म्हणतील हाय हाय ! मी जाता राहील कार्य काय? गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या आवाजातील कविवर्य भा. रा. तांबे यांची कविता रेडियोवर ऐकताना मन एकदम भूतकाळात गेले. इयत्ता दहाव्या वर्गात शिकत असताना ही कविता मनात शिरली. मराठीच्या शिक्षकांनी तसा जीव ओतून शिकविला त्यामुळे ती कविता आज ही मनात घर करून आहे. कवितेतील प्रत्येक ओळीतून एकच अर्थ मिळतो की, आपल्या मरणानंतर आपले येथे काहीच उरत नाही. जसे राम आणि कृष्ण आले व गेले तसे आपण ही आलो आहोत आणि एके दिवशी जाणार आहोत. आपल्या मृत्यूनंतर घरातील मंडळी आणि नातलगामधील लोक काही काळासाठी शोक करतील, दुःख व्यक्त करतील आणि त्यानंतर नित्यनेमाने कामाला लागतील. जो जन्माला आलेला आहे तो उद्या मरणारच आहे, हे त्रिकालबाधित सत्य आहे यात शंकाच नाही. या पृथ्वीवर जन्माला येताना रिकाम्या हाताने आलो आहोत आणि रिकाम्या हातानेच जाणार आहोत. याबाबतीत जगजेत्ता सिकंदराचे उदाहरण तंतोतंत लागू पडते. त्याची शेवटची ईच्छा होती की, दोन्ही हात बाहेर दिसतील असे ठेवा म्हणजे लोकांना कळेल की, एवढं श्रीमंत असून देखील त्यांनी सोबत काही नेले नाही. आपण केलेली कमाई, धनदौलत, जमीनजुमला, घर, संपत्ती, सर्व काही येथेच राहते. फक्त आपल्या चांगल्या कर्मामुळे आपले नाव तेवढे जिवंत राहते. म्हणूनच म्हटले जाते की, पैसा कमाविण्यापेक्षा माणुसकी कमवा. धनाने गरीब असाल तरी चालेल पण मनाने गरीब राहु नका. चांगली कर्मे करणारा व्यक्ती हा कधी ही गरीब राहू शकत नाही.

समाजात त्याला चांगली प्रतिष्ठा , मानसन्मान ह्या सर्व गोष्टी अगदी फुकटात मिळतात. पैसा खर्च करून सुध्दा ह्या बाबी सहजासहजी मिळत नाहीत. समाजाला आणि देशाला उपयोगी पडेल असे कार्य केल्यास आपले जीवन व्यर्थ जाणार नाही. देशाच्या रक्षणापायी आजपर्यंत कित्येक जवान मृत्यूमुखी पडले. त्यांचे जीवन व्यर्थ गेले नाही. ते अजरामर झाले आहेत. आपले अनमोल जीवन ही व्यर्थ जाऊ नये, आपण ही या देशाचे व समाजाचे ऋण फेडावे असे वाटत असेल तर अगदी फारच सोपे कार्य आपणासमोर आहे ते म्हणजे आपल्या मृत्यूनंतर अवयवदान करणे. आज आपण एकविसाव्या शतकाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानामधील संगणक युगात वावरत आहोत. कवी केशवसुत यांनी आपल्या तुतारी कवितेत म्हटल्याप्रमाणे जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळूनी किंवा पुरुनी टाका. जुन्या चालिरिती, पध्दती, प्रथा यांना तिलांजली देऊन आपल्या मृत्यूनंतर अवयवदान देण्याची तयारी ठेवणे गरजू लोकांसाठी एक संजीवनी ठरणार आहे, एवढे मात्र नक्की. आपल्या शरीरातून जेंव्हा चेतना नष्ट होते तेंव्हा आपला मृत्यू झाला असे जाहीर केल्या जाते. आपल्याला मृत्यू म्हटले की अंगावर काटा उभा राहतो. हा विषय देखील चर्चिला जाऊ नये असे वाटते. पण प्रत्येक सजीवाला मृत्यू अटळ आहे. आपल्या मृत्यूनंतर परंपरेनुसार त्या शरीराची काही जण दफन करतात तर काही जण दहन करतात. म्हणजेच मृत्यूनंतर ते शरीर काहीच कामाचे नाही म्हणून ही कृती केल्या जाते. परंतु आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या शोधातुन माणसाच्या मृत्यूनंतर काही तास शरीरातील काही अवयव त्यांच्या आंतरिक प्रक्रियेमुळे जिवंत राहतात. जसे की, डोळे ( सात ते आठ तास ) किडनी, हृदय इत्यादी ठराविक वेळासाठी मेलेल्या व्यक्तीमध्ये जिवंत राहतात. तसेच ते अवयव गरजू लोकांना ठराविक कालावधीत प्रत्यारोपण करून बसविता येते. म्हणूनच मृत्युपश्चात अवयवांचे दान करता येते. त्यामुळे त्या व्यक्तीची ती गरज पूर्ण होते आणि त्यास दीर्घकाळाचे जीवन मिळू शकते. जसे रक्त कोठेच तयार करता येत नाही अगदी तसेच मानवाच्या शरीरात

असलेले अत्यंत महत्वाचे असे डोळे, किडनी, हृदय इत्यादी अवयव कोणत्याच कारखान्यात तयार करता येत नाही. त्यास मनुष्य जन्मच घ्यावा लागतो. त्यास्तव तो देह जाळणे आणि पुरणे एवढ्याच कामासाठी शिल्लक असेल तर त्यास दान दिल्याने काय बिघडते? मात्र यामुळे अनेकांच्या समस्या दूर होऊ शकतात. अनेक गरजूना नवजीवन मिळू शकते. तसे जिवंत असताना आपण अनेक प्रकारचे दान देऊन पुण्य मिळविण्याचा प्रयत्न करतो. दानशूर व्यक्ती त्यालाच म्हटले जाते जो आपल्या जवळील सर्व वस्तूचे दान देतो. यासाठी महाभारतातील कर्णाचे उदाहरण दिले जाते. बहुतांश लोक अन्नदान करतात. काही नवयुवक मंडळी रक्तदान करतात. काही लोक पैसा दान करतात तर काही कपडे दान करतात. काही मरणोत्तर नेत्रदान आणि देहदान करण्याचा संकल्प करतात. या सर्व दानाच्या प्रकारात अवयवदान सर्वश्रेष्ठ आहे. त्याची आपणास पूर्ण माहिती झाल्याशिवाय तसेच प्रचिती आणि स्वअनुभव आल्याशिवाय त्याची महती कळणार नाही. अवयवदान केल्यामुळे मृत्यू झालेली व्यक्तीसुद्धा त्या अवयवाच्या रुपात दुसऱ्या व्यक्तीच्या माध्यमातून जिवंत असू शकतो. म्हणजे जिंदगी के साथ भी आणि जिंदगी के बाद भी या स्लोगनप्रमाणे. दक्षिण भारतीय चित्रपटातील नागार्जुना, सौंदर्या आणि श्रीकांत या अभिनेत्यांनी नुवस्तावनी या तेलगू चित्रपटात या अवयवदानाचे महत्त्व फार सुंदररित्या अधोरेखित केले आहे. प्रशासन आणि वैद्यकशास्त्र विभागानी या अवयवदानाबाबत लोकामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे फार गरजेचे आहे. चित्रपट क्षेत्रातील मंडळीनी या विषयावर चांगला चित्रपट तयार करून लोकांमध्ये अवयवदानाची संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न करावा. कविवर्य भा. रा. तांबे यांच्या मी जाता राहील कार्य काय? या प्रश्नाचे उत्तर अवयवदानाच्या संकल्पनेतून नक्कीच करता येईल. याविषयी सर्वानी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे, असे वाटते. मरावे परी कीर्ती रूपी उरावे असे पूर्वी म्हटले जायचे पण आत्ता मरावे परी अवयवरूपी उरावे असे म्हणणे उचित ठरेल.

# परावलंबी जीवन

समर्थ रामदास स्वामी यांनी म्हटले आहे की,

**जो दुसऱ्यावरी विसंबला**

**त्याचा कार्यभाग बुडाला.**

परावलंबी जीवनात कसल्याही प्रकारची प्रगती होत नाही. व्यक्ती आळशी बनतो, त्याला काही करावे असे मुळीच वाटत नाही. म्हणून स्वावलंबी जीवन जगण्याचा नेहमी प्रयत्न करावा. त्यामुळे मानसिक समाधान तर मिळतेच शिवाय उत्तरोत्तर प्रगती देखील होत राहते. मला हे जमत नाही म्हणून मदतीसाठी कुणाकडे हात पसरणे एक किंवा दोन वेळा ठीक आहे मात्र वारंवार जर आपण त्या बाबतीत मदत घेऊ लागलो तर त्याविषयी आपले काम नेहमीच अडखळून राहते. काही गोष्टी कधी ना कधी शिकावेच लागते तर त्यास मला जमत नाही असे म्हणून मागे सारण्यात अर्थ नाही. उलट ते काम शिकण्याची तयारी ठेवल्यास एक दिवस नक्की त्या कामात यश मिळू शकते.

शालेय जीवनात अनेक मुले वर्गातील हुशार मुलांवर अवलंबून असतात. गृहपाठ किंवा स्वाध्याय पूर्ण करण्यासाठी वर्गातील हुशार मुलांच्या वह्या वापरले जातात. परीक्षा जवळ येऊ लागले की त्यांचेच नोटस मागितले जातात. त्यामुळे ही मुले स्वयंपूर्ण होऊच शकत नाहीत. अर्थात याच कारणामुळे हुशार मुले सदैव पुढेच असतात तर स्व अभ्यास न करणारी मुले मागेच राहतात. त्यासाठी शालेय जीवनापासून आपण स्वावलंबी राहण्याचा प्रयत्न केल्यास आपण चांगली झेप घेऊ

शकतो. काही गोष्टी समजून घेण्यासाठी इतरांची मदत आवश्यक असते मात्र ती मदत घेताना त्याच्या अधीन होऊ नये याची काळजी घ्यावी.

कुटुंबात मुले जेंव्हा लहान असतात तेंव्हा ती परावलंबी जीवन जगतात. त्यांना कुटुंबातील प्रत्येकजण मदत करीत असतो. कमावते वय झाल्यावर देखील तुम्ही कुटुंबात परावलंबी जीवन जगत असाल तर कोणी तुम्हाला जवळ येऊ देणार नाही. ठराविक काळापुरते सर्वजण मदत करतात. मात्र त्यानंतर ऐतखाऊ आहे म्हणून दुर्लक्षित करतात. आपल्या स्वतःचे एक कुटुंब तयार झाल्यावर तर दुसऱ्यांवर विसंबुन राहणे कसे जमेल ? जमणार नाही. कुठे ना कुठे काही ना काही काम करून पैसे कमवावे लागते तेंव्हाच कुठे घर चालते.

म्हणून कोणतीही व्यक्ती परावलंबी जीवन दीर्घकाळ जगू शकत नाही. ज्याचे हात, पाय आणि मेंदू नेहमी सक्रीय कार्यरत असते त्याचे जीवन स्वावलंबी तर असेच शिवाय प्रगतीशील राहते. इतरांकडे नोकरी करणे म्हणजे एकप्रकारे परावलंबी जीवन होय कारण याठिकाणी आपल्या मनानुसार जीवन जगता येत नाही. आपणास जेंव्हा सुट्टी हवी असते त्यावेळी सुट्टी मिळत नसेल तर आपल्या या परावलंबी जीवनाचा खुप राग येतो. त्यासाठी स्वतःचे काही उद्योग किंवा रोजगार निर्माण करणारे मंडळी आपले जीवन आनंदात जगू शकतात. प्रसिध्द उद्योजक नेहमी म्हणतात की, कुणाकडे रोजगारासाठी हात पसरण्यापेक्षा दुसऱ्यांच्या हाताला काम देता येईल असे काही तरी काम करावे.

हे सर्वांना जमणार नाही पण ज्याना जमते त्यांनी असे प्रयत्न चालू ठेवणे आवश्यक आहे. इंग्रज भारतात येण्यापूर्वी भारतातील सर्व खेडी स्वयंपूर्ण होती म्हणजे स्वदेशी वस्तू वापरुन स्वावलंबी होते. मात्र इंग्रजानी त्यांच्या वस्तू भारतात आणल्या आणि येथील लोक परावलंबी होऊ लागले. पूर्वी कामाच्या मोबदल्यात धान्य दिले जात असे त्यामुळे पैश्याची कुठे गरज पडत नव्हती. मात्र कालांतराने कामाच्या मोबदल्यात पैसा आला तेंव्हापासून प्रत्येक वस्तू विकत मिळू लागली.

याच वेळी लोकांच्या परावलंबी जीवनाला सुरुवात झाली. पूर्वी दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती तेंव्हा लोक कोसो मैल पायी जात असत. कोणावर अवलंबून राहत नसत. आज त्या उलट आहे दळणवळणाची अनेक साधने उपलब्ध असल्यामुळे स्वतःचे हात-पाय कशाला हलवायचे असे विचार आपण करतो.

पूर्वी गावात अनेक विहीरी आणि हातपंप असायचे पाण्यासाठी. आज विहीरी बुजल्या आणि हातपंप बंद पडले. एक बटन मारले की बोअरवेलद्वारे पाणी वर येते. हे आपले तंत्रज्ञानामधील विकास आहे मात्र एक-दोन दिवस काही कारणाने गावात लाईट नसेल तर चूळ भरण्यास ही पाणी मिळत नाही, ही वाईट अवस्था खेड्यात बघायला मिळते. यास कोणते जीवन म्हणाल ? स्वावलंबी की परावलंबी..! आपण एक पाऊल देखील पायी चलण्यासाठी तयार नाही. जवळच्या अंतरावर देखील गाडीचा वापर करतो. प्रत्येक काम करताना आपण दुसऱ्यां कश्यावर तरी अवलंबून असतो म्हणून आपले सर्व काम बिघडत जातात. तेंव्हा आत्ताच सर्वानी आत्मपरीक्षण करून ठरवा की आपले स्वतःचे जीवन स्वावलंबी आहे की परावलंबी.

# चला मित्र बनवूया .....!

व्यक्ती तितक्या प्रकृती असे मानसशास्त्र सांगते. आपणही सहजच बोलून जातो की, सर्वचजण मुळीच एकसारखे नसतात. जसे की हाताची पाचही बोटे एकसारखी नसतात त्याप्रमाणे परंतु एखाद्या व्यक्तीचा खरा स्वभाव त्यांच्या मित्रमंडळीवरुन स्पष्ट करता येऊ शकते. ज्याप्रकारचा आपला स्वभाव असेल त्याच प्रकारचे मित्र आपल्या सभोवती भेटत असतात. जीवनात मैत्रीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी आणि मूल इत्यादी नाते मिळविण्यासाठी विशेष असे कष्ट करावे लागत नाही. पण एखादा चांगला मित्र मिळविणे म्हणजे जीवनाची एकप्रकारे कसोटीच असते.

प्रत्येक व्यक्ती भरपूर संपत्ती व उत्तम आरोग्य मिळविण्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो. परंतु चांगले मित्र मिळावे यासाठी कोणी मागणी वा प्रार्थना करताना दिसतो काय ? नाही. मित्रत्व ही बाब ऐच्छिक आहे. जीवनात प्रत्येकाना एक तरी मित्र नक्की असतोच. ज्याना एकही मित्र नाही अशाचे जीवन व्यर्थ आहे असे म्हणायला हरकत नाही. तसेच प्रत्येकाला खरा मित्र मिळतोच असेही काही नाही. ' सुख के सब साथी दु:ख में न कोई ' असे एक गीत आपणास सांगते की, जेंव्हा आपल्याजवळ गडगंज संपत्ती असेल तेंव्हा आपली स्तुती, प्रशंसा आणि वाहवा करणारे खुप मित्र मिळतात. परंतु जेंव्हा आपल्याजवळ संपत्ती नसते तेंव्हा कुणी ही आपले मित्र व्हायला तयार होत नाहीत. जुने मित्र देखील साथ देत नाहीत. एवढेच काय आपल्या सोबत खेळलेले, शिकलेलले, एका ताटात जेवलेले बालमित्र सुध्दा आपल्या गरिबीमध्ये आपणास पूर्णपणे विसरून जातात. संकटाच्या वेळी मदत

करणारा मित्र हाच खरा मित्र असतो अशी मित्रांची व्याख्या फार पूर्वीपासून राम आणि श्याम च्या गोष्टीरुपात ऐकत आलो आहोत.

पुष्कळ वेळा जवळच्या नातेवाईकांपेक्षा मित्रत्वाचे नाते फारच जिव्हाळयाचे वाटतात. दु:खाच्या प्रसंगी मनाला धीर देऊन आत्मविश्वास निर्माण करणारे व सुखात आनंद द्विगुणित करणारे मित्र सर्वच जणाना हवेहवेसे वाटतात. चुकलेल्या पावलांना दिशा देणारा, सुटत चाललेला तोल सांभाळणारा आणि संकट समयी आधार देणारा तोच खरा मित्र आहे. असा मित्र ज्याला लाभला त्याचे जीवन नक्की बदलते आणि त्याच्या एवढा सुदैवी दुसरा कोणीच असू शकत नाही. पण सर्वानाच असे मित्र भेटतील काय ? नक्की मिळेलच किंवा मिळणार देखील नाही ही ज्याच्या त्याच्या दैवाची बाब आहे. जीवनात चांगले मित्र मिळविणे जेवढे कठीण वाटते तेवढे सोपे देखील आहे. आपली विचारशक्ती म्हणजे बुध्दी जर चांगली असेल तर नक्कीच चांगले मित्र निवडता येतात. काही निव्वळ स्तुती करणारे, अलंकाराप्रमाणे सौंदर्यवर्धक मित्र जीवनात काही कामाला पडत नाहीत. असे मित्र फक्त संधीसाधू किंवा स्वार्थी समजल्या जातात.

चांगला मित्र प्रेमाने प्राप्त करावा लागतो. मित्र धनाने नव्हे तर मनाने श्रीमंत असायला पाहिजे. भगवान श्रीकृष्ण आणि सुदामा यांचे मित्र-प्रेम आपणा सर्वांना ज्ञात आहेच. सुदामा अत्यंत गरीब असून देखील मित्रासाठी सोबत काही तरी घेऊन जावे म्हणून पोहे घेतो. श्रीकृष्ण भगवानसाठी पोहे मिळविणे अवघड बाब होते काय ? निश्चितच नाही. परंतु मित्रत्वात अशी एकमेकांची भावना समजून घेण्याची मानसिकता निर्माण होणे आवश्यक आहे. अन्यथा अहंपणा आणि गर्वपणा आपल्या अंगी वाढतच जाते.

मित्राशिवाय जीवन म्हणजे पाण्याशिवाय मासोळीचे जीवन जगू शकत नाही त्याप्रमाणे मित्रांशिवाय आपले जीवन काहीच नाही अगदी तसेच आहे. मैत्री

मध्ये गरीब-श्रीमंत उच्च-नीच अश्या प्रकारचा कुठली ही दरी नसते. आरश्यात आपली जशीच्या तशी प्रतिमा दिसते. ज्याद्वारे निरीक्षण करून आपण ठरवित असतो की, मी कसा दिसतो ? तसेच काही काम खऱ्या मित्रांचे आहे. शालेय मित्राची ओळख आपण आयुष्यभर विसरू शकत नाही.

शालेय वयात ज्यांना चांगले मित्र लाभले त्याचे आयुष्य सफल झाल्या सारखे आहे. जीवनातील चांगले-वाईट गुण-दोष दाखविण्याचे काम मित्र करतात. म्हणूनच त्यांना जीवन प्रवाहाला वळण लावणारे तट असे संबोधिले जाते.

नदीच्या प्रवाहाप्रमाणे खरे मित्र आपल्या जीवनाला वळण देतात, मर्यादा घालतात. मित्र म्हणजे हृदय यावरूनच मित्राला सुहृदय असा शब्दप्रयोग आला असावा, असे वाटते. मित्र जीवनात हवेहवेसे वाटतात कारण प्रत्येक सुख दुःखमध्ये फक्त आणि फक्त मित्राची साथ आपणाला मिळते. बालपणीचे मित्र, शाळेतलले मित्र, महाविद्यालय मित्र आणि नौकरीच्या ठिकाणी मिळणारे मित्र असे मित्राचे वर्गीकरण करता येईल. बालपणीचे मित्र जेंव्हा खूप वर्षानंतर मिळतात तेंव्हा खूप आनंद होतो. काय बोलावे ? हे ही सुचत नाही. खूप गप्पा होतात, चहा-पाणी होते, त्यांनी ज्या ठिकाणी खाल्ले, झोपले उठले, बसले अभ्यास केले, रुसले, फुगले, मारामारी केले आणि खेळले त्या जागेत काय काय बदलले यावर विचार होते आणि मनात एक वेगळाच आनंद देऊन जातो. बालपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा असे म्हटल्या जाते ते यामुळेच याची प्रचिती यनिमित्ताने पुन्हा एकदा होतो.

आजच्या दिवशी प्रत्येकजण मोठ्या आनंदात फ्रेंडशीप डे साजरा करतात. मित्रत्वाचे बैंड मनगटात बांधले की उत्सव साजरा झाला असे वाटते. पण आपण कधी कोणाचे खरे मित्र झालो आहोत काय ? तसा कधी प्रयत्न तरी केला आहे काय ? त्याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. ' एकमेका सहाय करू, अवघे धरु सुपंथ '

असे संतानी म्हटले आहे. त्याचा वापर आपण आपल्या जीवनात केला पाहिजे. आपण कोणाचे तरी खरे मित्र झाल्यास आपणास देखील तसे मित्र भेटतील. कामापुरता मामा करून मित्रांचा उपयोग केल्यास आपणाला कोण बरे मित्र बनवतील !

आपण कोणाला मदत करायचे नाही व सर्वजण मात्र मला मदत करावी, सहानुभूतीपूर्वक पहावे अशी अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे ? तर चला मग आज आपणही कोणाचे तरी खरे मित्र बनण्याचा प्रयत्न करूया आणि आपण सारे जाती-पाती, धर्म-पंथ, स्त्री-पुरुष हे सर्व विसरून चला मित्र बनूया ......!

# पर्यटकांनी जबाबदारीने वागावे

आपल्या भारतीय परंपरेला एक इतिहास आहे. आणि हा सर्व इतिहास आपणास गड आणि किल्ल्याच्या शिल्लक असलेल्या अवशेषावरुन लक्षात येते. अनेक इतिहासतज्ञ या पुरातन वस्तूवरुन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करतात. म्हणून आज उपलब्ध असलेले गड आणि किल्ले हेच खरे तर इतिहासाचे मूक साक्षीदार आहेत. परंतु आपण सर्वजण याची काहीच काळजी करताना दिसत नाहीत. पहिली गोष्ट तर गड आणि किल्ले सुरक्षित आहेत काय ? याचा विचार तर दुरच हे गड किल्ले पाहण्यासाठी कोणी जात नाहीत. जे जातात ते या गड आणि किल्याला प्रदूषित करतात. काही हौसी मंडळी गड आणि किल्ल्यावर आपले नाव लिहितात, कोणी चारोळी लिहून ठेवतात, तर कोणी वेगवेगळे चित्र काढून गड आणि किल्याचे सौंदर्य नष्ट करतात. ते एक ऐतिहासिक वास्तु आहे आणि तिचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे हे साफ विसरून जातात. अश्या लोकांना वेळीच आवर घालून दंडीत करायला हवे. त्यांना दंड लावले की पुढे कोणी असे विचार डोक्यात आणणार नाही. काही मंडळी गड आणि किल्यावर पिकनिक म्हणून येतात. सोबत येताना खाण्याचे भरपूर खाद्यपदार्थ आणतात. त्याचा आस्वाद घेतात आणि तेथेच कचरा टाकून मोकळे होतात. त्यांना फक्त पिकनिकची मजा घ्यायची असते. आपल्या अश्या वागण्यामुळे गड आणि किल्ले पाहण्यास येणाऱ्या पर्यटकाना किती त्रास होईल याचा अजिबात विचार न करणारे खरोखर त्या गड व किल्याचा अभ्यास करतील काय किंवा संरक्षण करतील काय ? हा फार मोठा प्रश्न पडतो. त्याच सोबत या ठिकाणी असे जोडपे दिसून येतात जे की लग्नाच्या पूर्वी एकत्र फिरण्यासाठी येतात. पुण्याजवळील एक दोन किल्याच्या ठिकाणी

कॉलेजमध्ये शिकणारी मुले-मुली एकत्र दिसण्याचे प्रकार खुप आढळून येतात. गड आणि किल्याचा वापर हे नवयुवक असे करत असतील तर त्यांच्याकडून इतिहास जपून ठेवण्याच्या बाबतीत काय अपेक्षा ठेवता येईल ? असे प्रकरण तेथे होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे, अन्यथा अश्या गैरप्रकारामुळे गड किल्ले पाहण्याऱ्या लोकांची संख्या अगोदरच कमी आहे त्यात अजून घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचसोबत यावर उपाययोजना म्हणून गड किल्ले पाहायला जाणाऱ्या सर्वांचे आधार कार्ड आणि त्याचे मोबाईल क्रमांकसुद्धा घेण्याची सुविधा निर्माण करावी लागेल.

काही दिवसापूर्वी नांदेड जिल्ह्यातील माहूरगडाच्या जंगलात दोन प्रेमी युगुलाची निर्घृण हत्या करण्यात आली. यापूर्वी सुध्दा असे अनेक घटना घडलेल्या आहेत. असे प्रकार होऊ नये याची काळजी घेतली तर या किल्याचा इतिहास शाबूत राहू शकतो. अन्यथा बदनामी होण्यास जास्त वेळ लागत नाही. किल्याचा इतिहास जिवंत ठेवण्यासाठी शासन स्तरावरुन काही ठोस कृती कार्यक्रम तयार होणे देखील अत्यंत महत्वाचे आहे. जास्तीत जास्त लोकांची या गड आणि किल्याकडे लक्ष जाण्यासाठी महत्वपूर्ण योजना तयार करून त्याची अंमलबजावणी होणे सुध्दा आवश्यक आहे.

शालेय जीवनात दरवर्षी सहलीचे नियोजन केल्या जाते. या वयातील सहलीत मिळालेली माहिती प्रत्येकांच्या चिरकाल स्मरणात राहते. मात्र बहुतांश शाळाकडून आयोजित करण्यात आलेल्या सहली ऐतिहासिक स्थळी न जाता प्रेक्षणीय स्थळाना भेट दिल्या जाते. काही शाळा तर शैक्षणिक सहल म्हटले की नुसती डोकेदुखी म्हणून त्या पासून चार हात दूर राहतात. पालक देखील आपल्या पाल्याना अश्या ऐतिहासिक स्थळी घेऊन जात नाहीत. त्यामुळे गड आणि किल्याकडे अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहण्याऱ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे आणि प्रेक्षणीय स्थळी पर्यटकांची संख्या भरमसाठ वाढत आहे. त्या ठिकाणी देखील काही इतिहास कळतो नाही असे काही नाही. मात्र मुलांना इतिहास या विषयात आवड

निर्माण करण्यासाठी, गड आणि किल्याची माहिती संकलित करण्यासाठी त्यांची शैक्षणिक सहल अश्या ऐतिहासिक स्थळी काढणे आवश्यक आहे. अश्या सहलीचे नियोजन करणाऱ्या शाळेला प्रवासात विशेष सवलत देण्याची प्रथा सुरु केल्यास चांगला परिणाम पहायला मिळेल. त्याच सोबत शाळेला एक प्रमाणपत्र वितरित केल्यास अजून चांगले होईल.

महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ नावाची संस्था कार्यान्वित आहे, त्या माध्यमातून या गड आणि किल्याचे संरक्षण कसे करता येईल ? तसेच इतिहासाचे मूक साक्षीदार म्हणून वर्षानुवर्षे कसे मदतगार ठरतील याची काळजी देखील घेणे आवश्यक आहे. आपल्या पूर्वीचे लोकं या गड किल्यात जगले आहेत, आपण प्रत्यक्षात हे पाहत आहोत तर आपल्या नंतरची पिढी फक्त चित्रात पाहू शकेल काय ? अशी शंका राहून राहून मनात येते. भविष्यात असे होणार नाही याची काळजी प्रत्येकानी घ्यायला हवे. गड किल्यावर वर्षातुन एकदा तरी जावे मात्र तेथे कसल्याच प्रकारची गैरवर्तणुक न करता त्या ठिकाणचे सौंदर्य अबाधित राखावे म्हणजेच इतरांना देखील त्याचे सौंदर्य पाहता येईल.

# उद्याची सुंदर पहाट........!

आर्थिक स्थिती लक्षात घेऊन राज्य सरकारने सरकारी नोकर भरतीवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला असल्याची बातमी नुकतेच वाचण्यात आले. बातमी वाचून अनेक युवकांना धक्का बसला असेल कारण गेल्या दहा वर्षापासून सरकार कुठलीही भरती प्रक्रिया केली नाही आणि पुन्हा येत्या एक दोन वर्षात भरती करणार नसल्याचे जाहीर केले. सध्या राज्यात दीड लाखाच्यावर रिक्त पदाची संख्या आहे. म्हणजे या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत आहे. त्यामुळे कामाचा गुणवत्ता काय राहणार हे विचार करू शकतो. देशात लाखोच्या संख्येने बेरोजगार युवक नोकरीसाठी भटकत आहेत. त्यांच्या हाताला कसलेच काम मिळत नाही. त्यामुळे ते उदासीन होत आहेत आणि नको त्या गैरमार्गाला जात आहेत.

समाजातील काही हुशार मंडळी या युवकांचा वापर करून स्वतः मोठे होत आहेत. कुणी त्यांना गैर मार्गाला लावित आहेत. तर काही युवक नैराश्येच्या खोल दरीमध्ये पडत आहेत. देशाच्या विकासात आणि प्रगतीमध्ये या सर्व बाबीचा परिणाम दिसून येत आहे.

भारत हा युवकांचा देश म्हणून संपूर्ण जगात ओळखला जातो. या देशातील युवकांनी ठरविले तर जगात एक क्रमांकाचे देश बनवू शकतात. यासाठी आवश्यक आहे शासनाची महत्वाकांक्षी धोरण आणि युवकांच्या हाताला काम. पण भारतात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे देशातील अनेक युवक आखातीसारख्या देशात कोणतेही काम करण्यासाठी जात आहेत.

ही बाब अापल्या देशासाठी नक्कीच कौतुकास्पद नाही. त्याच बरोबर येथील प्रत्येक युवकांना सरकारी नोकरी हवी आहे. स्वतःच्या बळावर एखादा उदयोग तयार करण्याची हिम्मत युवकामध्ये दिसून येत नाही. दुसऱ्यांची चाकरी करण्यापेक्षा मी इतरांना नोकरी निर्माण करण्याचे काम करतो ही धमक कोणत्याही युवकामध्ये आढळून येत नाही. प्रत्येक युवक अन्य ठिकाणी काम करण्याच्या शोधात भटकत असतो. त्यापेक्षा आपल्या कला कौशल्याने एखादा व्यवसाय सुरु केल्यास नोकरी पेक्षा जास्त पगार नक्कीच कमावू शकतो, असे कोणालाही वाटत नाही.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका कार्यक्रमात बोलताना युवकांना उद्देश्यून बोलले की, भविष्यात सरकारी नोकरी मिळेलच याची शाश्वती नाही त्यामुळे स्वयंरोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे. भारतातील युवकांना आज जे शिक्षण दिल्या जाते ते फक्त सरकारी नोकरी मिळविण्याच्या कामासाठी दिली जाते. आजच्या शिक्षणात फक्त डोक्याचे काम आहे. हाता-पायाला काम देईल असे व्यवसाय शिक्षण दिल्या जात नाही त्यामुळे शिक्षण घेऊन बाहेर पडणारा येथील युवक उद्योगधंदे करण्याच्या फंदयात न पडता आपल्या गावापासून कोसो दूर मोठ्या शहरात तुटपुंज्या पगारीवर काम करतात. ज्यामुळे त्याचा आणि त्यांच्या कुटुंबाचा विकास होऊ शकत नाही. वास्तविक पाहता प्राथमिक शाळेपासून विविध व्यवसायाची मुलांना तोंड ओळख देणे आवश्यक आहे, असे वाटते.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांनी देखील मूलभूत शिक्षण देण्यावर भर दिला होता. मात्र कोणत्याही आयोगाने याविषयी गांभीर्याने विचार केले नाहीत. आज शिकून सवरुन पंडित झालेली मुले शेतात काम करायला तयार नाहीत. शेतात काम करणे त्यांना कमीपणाचे वाटत आहे. म्हणजे आजचे शिक्षण मुलांना शेतीपासून दूर नेत आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. नापिकी आणि कर्जामुळे शेतकरी आत्महत्या करून घेत आहेत. कारण शेतीचे तंत्रज्ञान अजुनही त्यांना आत्मसात झाली नाही. नुसती शेती करण्यापेक्षा सोबत एखादा जोडधंदा

ठेवावे आणि त्यातून कसर भरून काढावे ही युक्ती युवकाजवळ असू शकते मात्र तो शेतात फिरायला तयार नाही हीच खरी शोकांतिका आहे. युवकानी शेती करायला सुरुवात केली तर भारत देशातील अन्नधान्याचे उत्पन्न दुपटीने वाढेल आणि खऱ्या अर्थाने देशाची प्रगती देखील होईल. पण असे होताना दिसत नाही कारण शालेय जीवनात या शेतीशी संबंधित एकही गोष्ट त्यांना शिकविल्या जात नाही किंवा त्याचा अनुभव देखील मुलांना दिला जात नाही, यात त्यांचा तरी काय दोष ! भरपुर बौद्धिक ज्ञान मिळवून तो ज्ञानी बनतो खरा पण इतर बाबीच्या अज्ञानामुळे तो मागे पडतो. त्याला स्वतःला रोजगार निर्मिती करण्याचे ज्ञान नसल्यामुळे त्याचे जीवन परावलंबी बनते.

धीरूभाई अंबानी यांचे जीवन चरित्र जर अभ्यासले तर लक्षात येते की सरकारी नोकरी मध्ये माणूस आहे त्या ठिकाणी राहतो तर व्यवसायात मन लावून काम केल्यास लक्षणीय प्रगती करता येते.

आमच्या एका मित्राचे उदाहरण नक्कीच सर्व युवकांना प्रेरणा देऊन जाईल. तो उच्च शिक्षित होता म्हणून जिल्ह्याच्या महाविद्यालयात नोकरी मिळविण्यासाठी गेला. तो खुप हुशार होता पण गरीब होता. नोकरीसाठी पैसे देऊ शकत नव्हता. अर्थात त्याला तिथे नोकरी मिळाली नाही. तो खुप उदास झाला आणि सरळ पुण्याला गेला. तिथे त्याच्या शिक्षणावर नोकरी मिळणार नव्हती हे त्याला माहित होते. त्याने एक साधी नोकरी धरली. त्या मालकाने त्याला कामाचे हजार बाराशे रुपये देत होता. मात्र त्याने ही नोकरी करता करता त्या व्यवसायाची सर्व कौशल्य आत्मसात केली. पूर्ण अभ्यास केला. जेव्हा त्याला वाटले की मी आत्ता हा व्यवसाय करू शकतो त्यावेळी त्याने आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि तोच व्यवसाय त्याने सुरु केला. अगोदरच हुशार असल्यामुळे दोन तीन वर्षात त्याचा व्यवसायावर जम बसला आणि तो अल्पावधीमध्ये लक्षाधीश बनला. एका महिन्याच्या नोकरीनंतर जी रक्कम त्याच्या हातात पडणार होती त्यापेक्षा डबल कमाई तो करू लागला. त्याच्या सोबतीचे सर्व नोकरीत आहे त्या पगारीत

समाधानी आहेत तर हा मात्र दिवसेंदिवस प्रगती करीत आहे. आज ही तो त्या कॉलेजला धन्यवाद देतो ज्यानी त्याला नोकरी दिली नाही. त्यांनी नोकरी दिली असती तर त्याची एवढी प्रगती झाली नसती असे तो नेहमी म्हणतो.

समाजात असे अनेक उदाहरण आहेत, ज्यापासून आपण काही तरी धडा शिकायला हवे. एका सरकारी जागेसाठी आज हजारांच्यावर अर्ज प्राप्त होतात. यावरून आपण देशातील बेरोजगार युवकांच्या संख्येचा अंदाज करू शकतो. सरकारच्या तिजोरीत पैश्याचा खडखडाट आहे म्हणून सरकार असे निर्णय घेऊ शकतात. मात्र आपल्या मनगटामध्ये दम असेल तर अश्या सरकारी नोकरीची वाट पाहत बसण्यापेक्षा स्वतःचा छोटासा रोजगार देखील आपला खुप मोठा स्वप्न पूर्ण करू शकतो.

म्हणून चला युवकांनो आपली मरगळ दूर करा, आळस झटका आणि जोमाने कामाला लागा उद्याची सुंदर पहाट आपली वाट पाहत आहे

# बुवाबाजीला वेळेवर ओळखा

सरकारने नुकतेच देशातील काही साधू बाबाचे नाव घोषित केले आहे. ज्यांच्या शी लोकांनी कोणत्याही बाबतीत संपर्क करू नये असे सांगितले आहे. यावरून बुवाबाजीचा विषय किती गंभीर बनला आहे याची प्रचिती येते. संपूर्ण जगात भारत असा एकमेव देश आहे ज्या ठिकाणी जादू मंत्र तंत्र या गोष्टी वर विश्वास ठेवला जातो. त्यास अनेक कारणे देखील आहेत ज्याच्या मुळे शासनास शेवटी आदेश काढावे लागले. भारतीय इतिहासात वर्षानुवर्षापासून जी परंपरा किंवा प्रथा आहेत त्याचा फार मोठा परिणाम समाजमनावर होत असतो. त्याच संस्कृती चा गैरफायदा ही मंडळी घेत असतात. देवा धर्माच्या नावाखाली लोकांच्या श्रध्देला तडे द्यायचे काम ही मंडळी करत असतात. त्यामुळे वेळीच या बुवाबाजी करणाऱ्या लोकांना ओळखून घेतले तर पुढील बरेच अनर्थ टळातात. पण लोकांना वेळेवर त्यांना ओळखणे फार कठीण जाते, त्यास प्रमुख कारण म्हणजे अज्ञान. भारतात साक्षरतेचे प्रमाण खुप कमी आहे. शिक्षणाचा गंध नसल्यामुळे अज्ञानी लोकांना अनेक प्रकारच्या संकटा ना तोंड द्यावे लागते. यांना प्रत्येकजण लुबाडत असतो. विविध प्रकारच्या समस्येमुळे ही मंडळी बुवाबाजीकडे वळतात. जसे की एखाद्या दाम्पत्याला मूलबाळ होत नसेल तर अमुक बाबाकडे गेल्याने मूल होते अश्या प्रकारचे मोफतचे सल्ले दिले जातात. त्याच सोबत अमुक व्यक्ती ला त्याचा फायदा झाला हे सांगायला देखील विसरत नाहीत. त्यामुळे अर्थात तिकडे त्यांचे लक्ष जाते. गरज वंताची सर्वात जास्त फसवणूक केली जाते कारण गरजवंताला अक्कल नसते असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. मूल होने किंवा न होने हे एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. कुणाच्या जादूने किंवा मंत्र तंत्रा च्या दोऱ्यांनी काही साध्य होत नाही हे वैज्ञानिक कारण प्रथम समजून घेतल्यास पुढील घटना होत नाहीत. पण तसे होत नाही म्हणून अश्या भोंदू लोकांचे फावत असते. आपण च त्यांना पोसलो आहोत याची जाणीव सर्वाना होने आवश्यक आहे.

मोठ्याचा आदर्श  समाजात जी मोठ मोठी मंडळी म्हणजे कुणी धनाने असेल तर कुणी कीर्ती ने ज्याना समाज आपले आयडॉल म्हणून पहाते अश्या लोकांनी तरी निदान अश्या लोकां जवळ जाऊ नये. देशभरात प्रसिध्दि मिळविण्यासाठी ही मंडळी सेलेब्रिटीचा हमखास वापर करतात. त्यामुळे मोठ्या लोकांनी अश्या लोकां पासून स्वतः दूर रहावे म्हणजे जनता आपोआप दूर राहील. पण जेंव्हा या बुवाबाजी घोषित करण्यात आलेल्या त्या साधू बाबा सोबत यांचे फोटो बघण्यात येतात तेंव्हा मनात खुप राग येतो. जनता मोठ्याच्या पावला वर पाऊल ठेवून चालणार यात शंका नाही. राजकारणी लोकांनी खास करून या बाबीपासून दूर रहावे आणि लोकांना अशा लोकांपासून दूर राहण्याचे आवाहन करावे म्हणजे खरा सकारात्मक परिणाम बघायला मिळेल.

बुवाबाजी किंवा या बाबा मंडळीच्या जादूटोणाला महिला वर्ग सर्वात जास्त बळी पडतात. त्यांची दैवा देव करण्याची वृत्ती तिकडे खेचुन नेते. असे केले तर तसे होते अशी धारणा बहुतांश महिलां मध्ये दिसून येते. त्यामुळे श्रद्धा असावी पण ते अंधश्रध्देत बदल होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात तर गल्लोगल्ली अनेक असे मंडळी असतात जे दिवसाढवळ्या महिलांची फसवणूक करतात. अंगात येणे, करणी आणि भानामती सारखे प्रकार तेथे पाहायला मिळतात. अश्या रोगावर ही बाबा मंडळी उपचार करतात अशी त्यांची ख्याती असते. वास्तविक पाहता पूर्वीच्या संतानी ऐसे कैसे झाले भोंदू अशा कवितेच्या माध्यमातून त्यांच्या पासून दूर राहण्याचा सल्ला दिलेला आहे. मात्र त्यांच्या बोलण्याकडे नेहमीच दुर्लक्ष करीत असतो. बुवाबाजी आणि कर्मकांडच्या पध्दतीला कुठे तरी आळा बसावे म्हणून शासनाने कायदा तयार केला परंतु त्याचा देखील तेवढा प्रभाव दिसत नाही. लोकांमध्ये जनजागृती निर्माण केल्याशिवाय ही बुवाबाजीकडे आकर्षित होणाऱ्याची संख्या कमी होणार नाही. स्वतः पहिल्यांदा या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन दूर राहण्याचा प्रयत्न केल्यास नक्कीच यावर आळा बसेल असे वाटते.

# बायको

सध्या सर्वत्र माझ्या नवऱ्याची बायको ही मालिका गाजत आहे. बायको हे शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या डोळयासमोर कित्येक चित्र उभे राहतात. बायको कशी दिसते किंवा असते हे कोणी कोणाला विचारण्यासारखा प्रश्न नाही. बायको असे म्हणताच काही लोकांच्या छातीत धस्स करते. तर काही जणाच्या कपाळावर आट्या पडतात. पण जीवनात बायको शिवाय पुरुषाचे जीवन अधुरे आहे. म्हणजे एकमेकाचे जीवन एकमेकाशिवाय अपूर्ण आहे. वयाच्या एकविसाव्या वर्षी पुरुष बायको करून घेण्याच्या पात्रतेचा होतो. तेंव्हापासून त्याला बायकोचे वेध लागतात. ती माझ्या जीवनात कधी एकदा येते याची उत्सुकता लागलेली असते. चांगली आपणास शोभेल अशी बायको मिळावी यासाठी अनेक स्थळ पाहण्यात येतात. अनेक ठिकाणचे कांदा पोहे आणि चहा यावरच समाधान मानावे लागते. मनासारखी बायको मिळत नसेल तर समाजाचा आणि लोकांचा खुप राग येतो. कोणी म्हणतात एकटा जीव सदाशिव खुप छान असते कशाला करतोस लग्न ? त्याच्या भानगडीत न पडलेले बरे ! अश्यावेळी माणसाची द्विधा मनःस्थिति होते काय करावे हेच सुचत नाही. हिंदी भाषेत एक म्हण आहे शादी के लडडू खाये तो भी पछतावे ना खावे तो भी पछतावे. शेवटी एकदाचे सोयारिक जुळते मोठ्या थाटामाटात लग्नसोहळा पार पडते. मन में लडडू फुटाची ती जाहिरात या क्षणी डोळयासमोर तरळत असते. त्याला वाटते की स्वर्ग आत्ता फक्त दोन बोटे उरली आहेत. नव्याचे नऊ दिवस या म्हणीप्रमाणे हे स्वप्नातील दिवस संपतात आणि खऱ्या अर्थाने संसाराला सुरुवात होते. स्वप्नातील परी वाटणारी बायको हळूहळू आपले हातपाय बाहेर काढायला सुरुवात करते. तिचे खरे रूप दाखवायला सुरु करते. त्यावेळी पुरुष काहीच करू शकत नाही. कारण पुरुषाला बायको ही आपल्या मुठीत

कैद करून ठेवते. बायको ही नवराऱ्याला बोटावर नाचविते असे म्हणतात. लग्नापूर्वी आईचे बोलणे ऐकणारा लग्नानंतर बायकोचे ऐकायला  लागतो. त्याच्यासमोर तसा पर्याय देखील नसतो. पुरुषाची स्थिती अडकित्यात सापडलेल्या सुपारी सारखी होते. काही वेळा असाही प्रसंग निर्माण होतो की बायकोचे ऐकावे की आईचे हे कळत नाही. इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती निर्माण झाल्यावर काय करावे हेच सुचत नाही. तरी त्यातून मार्ग काढवाच लागतो, त्याशिवाय पर्याय नसतो. बायकोचे ऐकले की आई नाराज होते आणि आईचे ऐकले की बायको ..! एका छाताखाली दोन बायका सुखाने राहू शकत नाही असे म्हटले जाते ते राहून राहून सत्य आहे असे वाटते. अश्या विपरीत परिस्थितीमध्ये जो पुरुष योग्य निर्णय घेतो त्याचेच जीवन यशस्वी होते. जाणकार पुरुष तर मौनम सर्वार्थ साधनम हेच ब्रीद लक्षात ठेवतात.  बायको या शब्दाला मराठीत अनेक पर्यायी शब्द आहेत जसे की पत्नी, भार्या, अर्धांगिनी आदि नावाने ओळखले जाते. पण खरोखरच बायको याचा कोणी अर्थ लावला तर काय लावेल ? नवऱ्याच्या नात्यातील लोकांना बायबाय करणारी आणि जे कोणी आपल्या नवऱ्याच्या आसपास येऊ इच्छित असेल त्यांना खो देणारी म्हणजे बायको होय. यात काही अंशी तथ्य नसेल पण बहुतांश घरात जे दिसते, जे घडते ते सर्वसाधारणपणे हेच आहे की, पुरुषांच्या जीवनात बायकोने प्रवेश केला की त्यांच्या नातलगमधील सर्वचजण हळूहळू दूर होतात आणि बायकोच्या नात्यातील मंडळी कळत नकळत जवळ येतात. हा संसाराचा नियम आहे. त्यातून कोणी सुटू शकला नाही. हे तर घर घर की कहाणी आहे. वास्तविक पाहता कोणा बापाची लाडकी मुलगी आपल्या घरात जेंव्हा नवरी म्हणून प्रवेश करते त्यावेळी तिचा पुनर्जन्म झालेला असतो नाही का ? कारण तिला तिचा स्वतःचा माहेर सोडून सासर मध्ये नव्याने संसार करावा लागतो. नविन अनोळखी माणसासोबत प्रेमपूर्वक आणि जबाबदारीने वागावे लागते. येथेसुद्धा तिची एक प्रकारे कसोटी लागते. त्या कसोटीमधून प्रत्येक बायकोला जावेच लागते. बायकोला

मोकळे सोडले तर ती डोक्यावर बसण्याची शक्यता असते म्हणून पुरुष तिला जास्तीत ज्यास्त बंधनात ठेवण्याचा प्रयत्न करतो, असे देखील बोलल्या जाते. तसेच असे अनेक उदाहरण पाहायला आणि ऐकायला मिळतात की बायकोला खुप मुभा दिल्यामुळे त्याचा संसाराची पुरती वाट लागली. त्यामुळे बायको जेंव्हा आपल्या कुटुंबाचा विचार करून पुढे पाऊल ठेवते तेंव्हा त्या घराची अधोगती होत नसून प्रगती होते. एखाद्या घराची प्रगती ही पुरुषांच्या कर्तृत्वावर असतेच त्याचसोंबत घरातील बायकोवर देखील खुप काही अवलंबून असते. घरातील सर्व सदस्याची सांभाळ तिलाच करावे लागते. काही काळापुरते ती आपल्या घराला भगदाड पाडले असे वाटत असले तरी जसा काळ पुढे सरकतो तसे तिच्यात देखील बदल होत असतात. ईथे एकमेकाना समजून घेऊन प्रेमाने वर्तन केल्याशिवाय कोणामध्ये बदल होत नाही. शेवटी बायकोला समाजात वेगवेगळी जरी नावे ठेवली असेल किंवा तिच्या नावाने बोटे मोडत असले तरी ती आपल्या परिवारासाठी झटत असेल तर तिला तिथे यश हमखास मिळणार पण तिच्या मनात कटुता, द्वेष किंवा मत्सर असेल तर त्याचे परिणाम शेवटी तिलाच भोगावे लागते हे ही सत्यच आहे. म्हणून आपल्या घराच्या प्रगती साठी बायकोने सामंजसपणे वागणे अत्यावश्यक आहे. त्यात खर तर कुटुंबाचाच फायदा होतो पण हे समजून घ्यायला हवे.

## मला माणूस व्हावेसे वाटते......

माणूस म्हणून जन्माला आला आहेस तर माणूस म्हणून जगावे असा उपदेश प्रत्येक ठिकाणी ऐकायला मिळतो. घरात वाडवडील तेच सांगतात, शाळेत शिक्षक तेच माणुसकीचे धडे देतात, समाजात प्रतिष्ठित मंडळीसुद्धा त्याच विषया वर बोलताना दिसून येतात. संत, महात्मा, किंवा विचारवंत देखील याच विषयी लोकांना मार्गदर्शन करतात. पण तरी देखील माणुसकी नावाची वस्तू प्रत्येक ठिकाणी का दिसत नाही असा एक प्रश्न मला नेहमी पडत आला आहे आणि त्याचे उत्तर अजून तरी सापडले नाही असेच म्हणावे लागेल. कारण आज ही बरेच लोकांना माणुसकी काय असते हे कळले नाही असे वाटते. त्यामुळे सर्वप्रथम मला माणूस व्हावेसे वाटते, येथूनच मग खऱ्या माणुसकीला प्रारंभ होते. ग्रामीण भागात वावरत असताना पदोपदी माणुसकीचा अनुभव येतो आणि त्या अनुभवाने माणूस प्रगल्भ बनतो. एकमेका सहाय करू अवघे धरु सुपंथ याची खरी प्रचिती ग्रामीण भागात दिसून येते. माणुसकी नावाची वस्तू आजही जिवंत आहे ते फक्त ग्रामीण भागात. एकमेकाबद्दल प्रेम, माया, ममता, आपुलकी या सर्व बाबी मला शहरापेक्षा ग्रामीण भागात जास्त दिसून येते. शहरात प्रत्येकजण फक्त धावत असतो. कधी कधी तर तो कुठे आणि कशासाठी धावतो हेच त्याला माहित नसते. पैशाच्या बळावर सर्व मिळविता येते, या विचारातून माणुसकी मिळविण्याचा प्रयत्न असफल होतो कारण माणुसकी ही विकत मिळणारी वस्तू नाही. आज माणूस पैसा कमाविण्यासाठी माणुसकी ही विसरून चालला आहे. म्हणून वाटते की सर्व प्रथम माणूस व्हायला शिकणे आवश्यक आहे. घरातील मुलांना अगदी लहानपणापासून मानवतेची शिकवण देणाऱ्या बाबी जाणीवपूर्वक केल्या तर त्यांचा अनुकूल परिणाम आपणास पाहण्यास मिळेल. लहान मुले खूपच संवेदनशील असतात. टीप कागद

प्रमाणे सर्व छोट्या छोट्या बाबी आत्मसात करतात. याचा आपण जरासे देखील विचार न करता त्यांच्या समोर कसे ही वागले जाते. ज्याचा की लहान मुलांवर विपरीत परिणाम होतो. पुन्हा आपणच म्हणणार की आजकालची पोरे खूपच फास्ट आहेत, मुले बिघडली आहेत असे बोलतो. त्यांना कोणी बिघडविली ? आपणच. आपली माणुसकी संपली की आपण कसे ही वागतो आणि त्याचा प्रभाव आपल्या सोबत असलेल्या बालकावर पडत असते. तीच पिढी माणुसकीहीन वागायला सुरु करते. त्यामुळे आई आणि वडिलांनी मुलांचे काळजीपूर्वक संगोपन करणे आवश्यक आहे. गरजू व्यक्तीला मदत करणे ही खरी माणुसकी पण गरजू माणसे ओळखावी कशी ? हा ही एक प्रश्न आहे. जो उठतो तो मी गरीब आहे मला मदत करा असे म्हणतो. देशात भिकारी लोकांची संख्या तर एवढी वाढली की ज्याला काम करावेसे वाटत नाही ते हातात कटोरा घेऊन भीक मागण्यास तयार होत आहे. रेल्वेस्थानक, बसस्थानक या ठिकाणी यांची भरमसाठ संख्या वाढू लागली. मग या सर्वावर कुणी माणुसकी का दाखवित नाहीत. यांचे वर जर माणुसकी दाखवायला हवी पण तसे होत नाही. कारण काही खोटी मंडळीनी ही हा सोपा मार्ग धरला आहे पैसे कमविण्यासाठी. सामाजिक कार्य हातात घेऊन काम करीत असताना माणूस म्हणून जगण्याचा आनंद मिळतो यात शंका नाही. म्हणून बरेच लोक या सामाजिक कार्यात सर्वस्वी अर्पण करून काम करीत आहेत. ते प्रसिध्दीसाठी असे कार्य अजिबात करीत नाही. तर त्यातून त्यांना निस्वार्थ सेवा करायची आहे. आपण कधी इतरासाठी एक क्षण काम केले आहे काय ? हे स्वतः च्या मनाला विचारून पहा. नेहमी स्वतःसाठी आणि स्वतः च्या कुटुंबासाठी जगत असताना इतरांना वेळ देताच आले नाही तेंव्हा आपणास काय माहित ? खाणे, पिणे, उठने, बसणे, झोपणे या सर्व क्रिया मी करतो तसे प्राणी आणि पक्षी देखील करतात मग त्यांच्यात आणि माझ्यात फरक तो काय हे समजून जो वागतो तो माणूस. एका कवितेत म्हटल्याप्रमाणे " अरे माणसा

माणसा, कधी होशील माणूस ?" म्हणून मित्रांनो मला नेहमी माणूस व्हायला आवडते आणि तुम्हाला ......... जरा विचार करा.

# वळीव पाऊस आणि जीवन

उन्हाळयात वातावरण एकदम गरम होत राहते. काम केल्यावर अंगातून जसे घाम बाहेर यावे तसे उन्हाळयात घाम बाहेर पडते. उन्हात कुठे बाहेर जावे असे वाटत नाही. घरात बसून कूलरचे थंडगार वारा खावे असे वाटते. पेपर मध्ये जेव्हा वाचण्यात येते की ऊष्माघाताने एकाचा मृत्यू त्यावेळी जीव कासाविस होते आणि उन्हाच्या वेळेत फक्त आराम करावेसे वाटते. शेतकरी मंडळी देखील उन डोक्यावर चढण्यापूर्वी काम थांबवितात आणि आराम करतात आणि तेच अगदी योग्य आहे. परंतु काही लोकांना उन्हा-तान्हाची तमा न बाळगता काम करावे लागते. त्यावेळी त्यांना पाहताना मनात कसे तरी वाटते

लग्न कार्य करताना घरातील मंडळीची होणारी धावपळ जीवघेणी असते मात्र फिरण्याशिवाय आणि काम करण्याशिवाय पर्याय नसतो. मात्र स्वतः ला उन्हापासून संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. बेसावध वागुन चालणार नाही. स्वतः च्या आरोग्याची काळजी स्वतः ला घेणे आवश्यक आहे. अश्याच या तप्त गरमीच्या काळात वळीवाचा पाऊस कुणाला सुखी तर कुणाला दुखी करून जातो. ज्यांच्या शेतात पीक आहे त्यांना ह्या वळीवाच्या पावसाचा त्रास होतो तर काही लोकांना प्रचंड उष्णतेपासून वाचण्यासाठी समाधानकारक वाटते. मात्र वळीवाचा हा पाऊस फारच विचित्र असतो. विजेचा कडकडाट आणि वारावादळ यामुळे आर्थिक नुकसानीसह काही ठिकाणी जीवित हानि सुध्दा होते. बऱ्याच पशु पक्ष्याना देखील आपले जीव गमवावे लागते. याबाबतच्या बातम्या जेव्हा वाचण्यात येतात तेंव्हा वळीवाच्या पावसाची खुप भीती वाटते.

जीवनात सुध्दा वळीवाच्या पावसासारखे काही प्रसंग उद्भवतात. आपले जीवन सुखी आणि आनंदाने चालू असताना एखादे प्रसंग घडते ज्यामुळे सुखी संसाराचे तीन तेरा वाजतात. अश्या वेळी सुध्दा मनाला एक प्रकारे तडे पडतात जे की बऱ्याच दिवसापर्यंत भरून निघत नाही. वळीवाच्या पावसाचे पडसाद समाजावर दिसून येतात तसे प्रसंग आपल्या जीवनात कधी न येवो याची काळजी प्रत्येकाने घ्यावे.

# युवकांच्या हाती हुंड्याची दोरी

स्वातंत्र्याच्या 70 वर्षानंतर ही हुंडयासारखी सामाजिक समस्या आजही ज्वलंत आणि उग्र स्वरुप धारण केले आहे. लातूर जिल्ह्यातील शीतल वायाळ या मुलीने आपल्या वडिलांकडे लग्नासाठी पैसे नाहीत, वडिलांची घालमेल पहावत नाही म्हणून स्वतःचे जीवन संपविले. तिच्या बळीने हा प्रश्न समाजापुढे एका वेगळया स्वरुपात समोर आले आहे. हुंड्यामुळे कोण कोण त्रस्त होत असतो ? याची जराशी कल्पना यामुळे आली. समाजात आजही हुंडयापायी कोणाचे लग्न थांबणे, नववधुंचा छळ करणे, या सर्व हुंडाबळीच्या घटना आपण डोळयाने आजही पाहतो आणि वाचन करीत आहोत. समाजातून हुंडा पध्दती समूळ नष्ट करणे  म्हणजे समाजातील रुढी आणि परंपरा यांच्याविरुध्द दिलेला एक लढाच नव्हे काय ? आज कोणी ही या विरुध्द बोलायला तयार नाही. हुंडा देणे आणि घेणे प्रतिष्ठेचे समजले जाते. नवरदेवाकडील मंडळी हुंडा न घेता लग्न करण्यास होकार दिले तर समाजातील इतर मंडळी एकमेकांच्या कानात कुजबुजतात की मुलांमध्ये काही तरी दोष आहे त्यामुळे तर ते हुंडा घेतले नाहीत. ही प्रथा म्हणजे समाजाला लागलेली एक वाळवी आहे.

हुंड्याच्या बाबतीत प्रत्यक्षात समाजात काय घडते ? वधू पिता आपल्या मुलींसाठी वर शोधत फिरत असतो. चांगले स्थळ मिळावे यासाठी तो सर्व प्रयत्न करतो. प्रत्येक वधू पित्याची ईच्छा असते की आपली मुलगी ज्या घरी पाठवित आहोत ते घर सुखसमृद्ध असावे, तिला त्रास होणार नाही याची काळजी घेऊन

सोयरीक जुळविली जाते. मग त्यासाठी हवी ती किंमत मोजण्याची तयारी वधूपिता दर्शवितो. याच गोष्टीचा फायदा वरपक्षाकडील मंडळी घेतात. त्यातल्या त्यात मुलगा सरकारी नोकरी किंवा चांगल्या हुद्यावर आणि पगारीवर असेल तर मग मनाला वाटेल ती रक्कम मागितली जाते. सध्या डॉक्टर, इंजिनियर, पोलिस आणि शिक्षक नवरदेवाचे भाव गगनाला भिडले आहेत. कारण या पेशेतील व्यक्ती सुखी समाधानी जीवन जगु शकतात. त्यामुळे या स्थळासाठी वधू पिता वाटेल ती रक्कम मोजण्यास तयार राहतात. लग्नाच्या प्रक्रियेत सर्वात महत्वाचा घटक म्हणजे नवरदेव. त्याने जर मनात आणले तर ही हुंडा पध्दत समूळ नष्ट होऊ शकते. लग्न जुळते वेळी ही नवरदेव मंडळी याविषयी ब्र ही काढत नाहीत त्यामुळे ही पध्दत फोफावत चालली आहे. सध्या जे युवक लग्न करण्यासाठी बोहल्यावर चढणार आहेत त्यांनी हुंडा न घेता साध्या पध्दतीने लग्न करून घेतल्यास त्याची नोंद समाज नक्की घेईल. प्रत्येक नवरदेवाने याविषयी एक वेळ तरी आत्मचिंतन करावे. आपल्या एवढ्या शिक्षणाचा काही अर्थ राहणार नाही असे वाटते. हुंडा न घेतल्याने समाजात जे मान सन्मान आणि स्वतः ला जो मानसिक समाधान मिळते ते किती ही पैसा देऊन मिळविता येत नाही, हे सत्य आहे. वधूने किंवा वधूच्या पित्याने हुंडा घेणाऱ्या नवरदेवाला मुलगी देणार नाही अशी शपथ घेऊन काही फायदा होईल असे वाटत नाही त्या ऐवजी नवरदेव किंवा त्यांच्या आई-वडिलांनी हुंडा घेणार नाही ही शपथ जास्त फलदायी ठरेल असे वाटते. जे युवक असे लग्न करतील अश्या कुटुंबाचे समाजाने नागरी सत्कार करावा म्हणजे हुंडा न घेता लग्न करण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल आणि जे अनपेक्षित घटना घडत आहेत ते घडणार नाहीत. हुंडा ही आपणच पेरलेले बी आहे तर त्याचे उच्चाटन आपणालाच करावे लागेल, एवढे मात्र खरे आहे.

## *बालविवाह कसे रोखता येतील ?*

विवाहासाठी आता वयाचा दाखला अनिवार्य करत असल्या बाबतचे वृत्त वाचून आनंद वाटला. याबाबतीत एनसीपीसीआर'चे सदस्य यशवंत जैन म्हणाले की, बालविवाह प्रतिबंधक कायद्याची स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांनंतर अंमलबजावणी न होणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे. त्यामुळे विवाह करताना वयाचा दाखला आता अत्यावश्यक करण्यात येत आहे. पुरोहित किंवा विवाह लावणारा धर्मगुरू अथवा घरातील कोणत्याही जबाबदार व्यक्तीने लग्नाच्या वेळी दारक-दारिकांच्या वयाचे प्रमाणपत्र दाखविले पाहिजे. त्यामुळे बालविवाह प्रथा मोडित निघण्यास मदत होईल. खरोखरच असे झाले तर बालविवाहाची पध्दत हळूहळू संपुष्टात येईल. देशात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम-२००६ चा कायदा असून देखील त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे हे सर्व प्रकार वाढत आहेत म्हणून आता विवाहबंधनात अडकणाऱ्या नवदाम्पत्यांना वयाचा दाखला अनिवार्य करण्याचा विचार शासन करीत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने या संदर्भात राज्य सरकारांना निर्देश देत मुलींचे वय १८ पेक्षा कमी आणि मुलांचे २१ पेक्षा कमी वयाच्या मुला-मुलींचे विवाह रोखण्यासाठी वय प्रमाणपत्र दाखविणे बंधनकारक करण्याचे सूचविले आहे. त्यानुसार सरकार यावर काय पाऊल उचलणार हे अजुन निश्चित झाले नाही. आंध्रप्रदेशातील पंचायतींमध्ये विवाह नोंदणीच्या वेळी वयाचे प्रमाणपत्र दाखविणे बंधनकारक करण्यात आले आहे, त्यामुळे बालविवाह रोखण्यात यश मिळत असल्याचे जैन यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले. लग्नाच्या नंतर नोंदणी करण्याऐवजी लग्नाच्या पूर्वी

ग्रामपंचायत, नगरपालिका आणि मनपा यांच्या कार्यालयाकडून वधू आणि वराकडील मंडळीनी मुलींचे आणि मुलांचे वय तपासून त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिल्यास अजुन सोइस्कर होईल असे वाटते. जे मुले-मुलीं वयाची अट पूर्ण करणार नाहीत ते लग्न झाल्या वर नोंदणी कार्यालयात येणारच नाहीत. पण लग्नापूर्वी ना हरकत मिळणे म्हणजे एक प्रकारे लग्न करण्याचा परवाना असे समजण्यास हरकत नाही. जसे वाहन चालविण्यासाठी परवाना आवश्यक असतो त्या नुसार विवाह परवाना आवश्यक नाही का वाटत ? या पध्दतीद्वारे मुलगी 18 वर्षाची आणि मुलगा 21 वर्षाचा झाला की त्यांची नोंदणी करून कार्यालयातून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन ठेवले की लग्न करण्यासाठी मोकळे. ज्यावेळी एखादे स्थळ एकमेकाना पसंद पडेल त्यावेळी दोन्ही पक्षांनी एकमेकांची ना हरकत प्रमाणपत्र पाहून सोयारिक जुळवून घेणे सोपे होईल. बहुतांश वेळा नविन लग्न झालेली मंडळी आपल्या विवाहाची नोंदणी करीत नाहीत असे सर्रास दिसून येते. त्यामुळे सर्वप्रथम विवाहाची नोंदणी करणे सर्वांना बंधनकारक करणे आवश्यक आहे.

भारतात वयाची आठरा वर्षे पूर्ण करणारी व्यक्ती भारतीय नागरिक होऊ शकते आणि त्यांना मतदान करण्याचा अधिकार मिळतो. त्यासाठी त्यांना निवडणूक ओळखपत्र दिल्या जाते. हे ओळखपत्र देताना निवडणूक आयोग पूर्ण काळजी घेते. परंतु यात विवाह झालेल्या मुलींच्या वयाच्या बाबतीत काळजी घेतली जात नाही. लग्न होऊन सासरी आलेल्या मुलींचे नाव या मतदार यादीत लग्नपत्रिका पाहून समाविष्ट केल्या जाते. कारण भारतात वयाची 18 वर्षे पूर्ण झालेल्या मुलींचे लग्न करणे कायद्याने आवश्यक आहे. तिचे लग्न झाले अर्थात ती वयाची 18 वर्षा ची अट पूर्ण केली असा ढोबळ अंदाज बांधून तिचे नाव मतदार यादीत समाविष्ट केल्या जाते. ही पध्दत कुठे तरी बंद झाली पाहिजे. लग्नाची अधिकृत नोंदणी पत्र पाहिल्याशिवाय मुलींचे नाव निवडणूक मतदार यादीत समाविष्ट करण्यात येवू नये असा नियम तयार झाले तरी थोड्या प्रमाणात बाल

विवाहाला आळा बसू शकतो, असे वाटते. बालविवाह रोखण्यासाठी फक्त सरकारने काही करावे किंवा शासनाने कठोर कायदे तयार करावे असे नाही तर प्रत्येक मुलां-मुलींच्या पालकानी याबाबतीत सजग होऊन विचार करणे आवश्यक आहे. कमी वयात लग्न लावल्यामुळे कोणत्या समस्या निर्माण होतात याची जाणीव पालकानी करून घ्यावी आणि समाजातील जागरूक लोकांनी याबाबतीत लोकांचे वेगवेगळया माध्यमातून उदबोधन करावे. बालविवाहच्या बाबतीत जनजागृती ही अत्यंत महत्वाचे आहे. आपल्या देशाला समृद्ध करण्यासाठी बालविवाह पध्दत समूळ नष्ट करणे अत्यावश्यक आहे. चला तर मग आपल्या परीने जसे होईल तसे बालविवाह थांबविण्यासाठी उपाय शोधू या..!

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.